विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक **यशवंत**

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/ शनिवार दि. १ जून २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-११४ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

**सुविचार**

अच्छा वक्ता तो कोई भी बन सकता है,
परन्तु दूसरों के लिए अनुकरणीय श्रेष्ठ
जीवन कितने लोग जीते हैं ?

## देशात येणार १०० टन सोने

नवी दिल्ली : आपल्या देशात १०० टन सोने येणार आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मोठ्या प्रमाणावर सोन्याची खरेदी करत आहे. सध्या आरबीआयकडे ८२२.१ टन सोने आहे. त्यातील निम्मे सोने परदेशात आहे. याशिवाय विदेशात जमा केलेले सोनेही मायदेशी आणले जात आहे. सेंट्रल बँकेने ब्रिटनमध्ये खरेदी केलेले १०० टन सोनेही भारतात हस्तांतरित केले आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने अलीकडेच सोन्याची मोठी खरेदी केली आहे. तसेच, सेंट्रल बँकेने ब्रिटनमध्ये खरेदी केलेले १०० टनांहून अधिक सोने देशातील त्यांच्या रिझर्व्हमध्ये हस्तांतरित केले आहे. सेंट्रल बँकेने ३३ वर्षांनंतर पहिल्यांदाच एवढे सोने आपल्या रिझर्व्हमध्ये ठेवले आहे. म्हणजे भारताने खरेदी केलेले सोने आता इंग्लंडच्या तिजोरीत राहणार नाही. त्यापेक्षा आता ते भारतीय रिझर्व्ह बँकेत ठेवण्यात येणार आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, मार्चअखेर आरबीआयकडे ८२२.१ टन सोने होते. यापैकी रिझर्व्ह बँकेने ४१३.८ टन सोने विदेशात ठेवले आहे.


त्याच वेळी, गेल्या आर्थिक वर्षात, आरबीआयने त्यांच्या साठ्यामध्ये २७.५ टन सोन्याची भर घातली होती. अशा स्थितीत आरबीआय परदेशातून एवढे सोने का खरेदी करत आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. तर आरबीआय हळूहळू परदेशात साठवलेल्या सोन्याचे प्रमाण कमी करुन ते भारतात आणत आहे. देशाची अर्थव्यवस्था मजबूत व्हावी यासाठी भारत आपले सोने परत आणत आहे. भारताला आपली अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी आणखी सोन्याची गरज आहे. देशातील सोन्याचा साठा वाढला पाहिजे

(पान ५ वर)

# रशियाचे अध्यक्ष पुतिन यांचे घर जळाले

## युक्रेनने हल्ला केला की आग लागली? युक्रेनवर केला मोठा आरोप





मॉस्को : रशियाचे अध्यक्ष पुतिन यांचे अल्ताई येथील निवासस्थान जळून राख झाल्याची बातमी समोर आली आहे. पुतिन यांच्या अल्ताई येथील निवासस्थानाला आग लागल्याचे वृत्त आहे. अल्ताई प्रजासत्ताकच्या ओंगुडेस्की जिल्ह्यात व्लादिमीर पुतीन यांचे निवासस्थान असलेली इमारत आगीत पूर्णपणे जळून खाक झाली अशी माहिती समोर आली आहे. पुतिन येथे मेडिसिनल बाथसाठी येत असतात. पुतिन यांच्या घरावर युक्रेनच्या लष्कराने हल्ला केला की आगीचे आणखी काही कारण आहे. याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

पुतीन यांच्या निवासस्थानाची जळणारेफोटो आणि व्हीडीओ रशियन माध्यमांतून समोर आली आहेत. फोटो पाहिल्यानंतर, आढळले की अल्ताई निवास परिसरातील एक इमारत जळून खाक झाली आहे. अधिकृतपणे, हे गॅझप्रॉमच्या मालकीचे अल्ताई यार्ड सेनेटोरियम आणि रिसॉर्ट कॉम्प्लेक्स आहे, येथे पुतिन मेडिसिनल बाथसाठी येतात.

पुतिन यांचे हे घर ३३ मिलियन अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त खर्च करून बांधण्यात आले आहे. २०१० मध्ये अल्ताई रिपब्लिकच्या ओंगुडेस्की जिल्ह्यातील वर्गीकृत बांधकाम प्रकल्पाची माहिती समोर आली. यानंतर यावर झालेल्या खर्चाचा तपशील समोर आला. हे घर पुतिन यांच्याशी संबंधित असल्याचा दावा स्थानिक विरोधी लोकांनी वारंवार केला आहे. कोणत्याही सामान्य रशियनला येथे येण्यास मनाई आहे. या घराचा उपयोग पुतिन यांनी मेडिसिन बाथसाठी केला होता.

आमचे सरकार युक्रेनच्या मुद्यावर चर्चे साठी तयार आहे असे रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी काही दिवसापूर्वी सांगितले. यासंदर्भात चीन दौ-यापूर्वी दिलेल्या एका मुलाखतीत व्लादिमीर पुतिन यांनी भाष्य केले. त्यामुळे ८०० दिवसांहून अधिक काळ सुरू असलेले रशिया आणि युक्रेनमधील युद्ध संपुष्टात येणार असल्याची चर्चा आहे. जोपर्यंत इतर देश आपले हित लक्षात ठेवतील तोपर्यंत रशिया चर्चेसाठी तयार आहे, असे व्लादिमीर पुतिन यांनी चीनची अधिकृत वृत्तसंस्था शिन्हुआला दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे. आम्ही युक्रेनवर चर्चेसाठी तयार आहोत, परंतु अशा चर्चेत संघर्षात गुंतलेल्या सर्व देशांचे हित लक्षात घ्यावे लागेल, असे व्लादिमीर पुतिन म्हणाले. दरम्यान. रशियाने फेब्रुवारी २०२२ मध्ये युक्रेनवर हल्ला केला होता.

# विठ्ठल मंदिराखाली सापडले भुयार



पंढरपूर : लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपुरच्या विठ्ठल- रुक्मिणी मंदिरात सध्या जीर्णोद्धाराचे काम सुरू आहे. विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे जतन, संवर्धन व्हावे यासाठी ७३ कोटी रुपयांच्या आराखड्याचे काम सुरू आहे. या अंतर्गत नवे बांधकाम हटवून जुने रुप समोर आणले जात आहे. अशातच मंदिरासंदर्भात एक महत्त्वाची माहिती मिळाली आहे.

मंदिर समितीचे मुख्याधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिलेल्या माहितीनुसार, पंढरपुरमधील विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे सुशोभिकरण करताना खोदकामा दरम्यान कानोपात्रा मंदिराजवळ एक भुयार आढळून आले आहे. सात ते आठ फूट खोलीचे हे भुयार असल्याचे सांगण्यात येत असून त्यामध्ये देवीची मूर्ती असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दरम्यान, आज मंदिर समितीसह अध्यक्ष औसेकर आणि पुरातत्व विभागाची टीम या खोलीची पाहणी करणार आहेत.

गुप्त खोलीची पाहणी विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे काम सुरु असताना काल रात्री २ वाजण्याच्या सुमारास विठ्ठल मंदिरातील हनुमान गेटजवळ एक गुप्त खोली आढळून आली आहे. सात ते आठ फूट रुंद असणाऱ्या या खोलीत मूर्तीसदृश्य वस्तू असल्याची माहिती मिळाली आहे. पुरातत्व विभागाची खोलीची पाहणी करण्यास आत उतरणार आहे. त्याचबरोबर या खोलीत नेमकं काय असणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, पुरातत्व विभागाच्या टीमने खोलीच्या आत उतरुन तपासणी केली असता तीन दगडाच्या मूर्त्या आणि पादुका सापडल्या असल्याची माहिती मिळत आहे. त्याचबरोबर नाणी आणि बांगड्यांचे अवशेषही सापडले आहेत. याप्रकरणी पुरातत्व विभाग अधिक पाहणी करणार आहे.



काशी प्रदेशात, काशी जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी जी यांच्या पावन उपस्थितीत, एक भारत श्रेष्ठ भारत, मराठी काशी संगम या कार्यक्रमाची आज काशी येथील जंगमवाडी मठात सांगता झाली. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

# डॉ. प्रवीण गेडाम नाशिकचे नवे विभागीय आयुक्त



**या पदासाठी दिपेद्रसिंह कुशवाह, राधाकृष्ण बी, नयना मुंडे यांची नावे चर्चेत होती नाशिक विभाग शिक्षक मतदार संघाची निवडणूक व २०२७ मध्ये त्र्यंबकेश्वर येथे भरणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळाचे आयोजन या बाबीचा विचार करता डॉ. प्रविण गेडाम यांच्या नियुक्तीला विशेष महत्व आहे.**

नाशिक ।कृषी आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांची नाशिकचे विभागीय आयुक्त म्हणून बदली झाली आहे. नाशिकचे विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे निवृत्त होत असल्याने त्यांच्या जागेवर कृषी विभागाचे आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांची नियुक्ती झाली आहे. अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा यांनी याबाबत आदेश काढला असून, डॉ. प्रवीण गेडाम यांनी तातडीने पदभार स्वीकारावा, असे म्हटले आहे.

डॉ. गेडाम हे अतिशय कर्तव्यदक्ष अधिकारी आहेत. डॉ. प्रवीण गेडाम यांनी २०१४ ते २०१६ या कालावधीत नाशिक मनपा आयुक्तपदाचाही कार्यभार सांभाळलेला आहे. त्यामुळे नाशिक हे त्यांना चांगले परिचित आहे. शिवाय, त्यावेळी झालेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याचे त्यांनी अतिशय काटेकोर नियोजन केले होते. त्यामुळे त्यादृष्टीने आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्र्वभूमीवर त्यांची नियुक्ती करण्यात आली असावी अशीही चर्चा आहे.

तसेच राज्यभरात गाजलेला जळगावचा घरकुल घोटाळा त्यांनी बाहेर काढला. याच प्रकरणी माजी आमदार सुरेश जैन आणि अन्य नेत्यांना तुरुंगवास भोगावा लागला. तसेच, डॉ. गेडाम यांनी नाशिक महापालिका आयुक्त पदासह विविध शहरांमध्ये अनेक जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. त्यांच्या सर्वोत्तम कारभाराची दखल घेत मोदी सरकारने त्यांना केंद्रात बोलवून घेतले. केंद्राच्या महत्त्वाकांक्षी आयुष्यमान भारत योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांना जबाबदारी देण्यात आली. तेथेही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. त्यानंतर त्यांनी परदेशात जाऊन हार्वर्ड विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांना राज्याचे कृषी आयुक्त आणि आता नाशिकचे विभागीय आयुक्त ही नवीन जबाबदारी देण्यात आली आहे.



# आ. अमित देशमुख यांनी घेतली भेट मोरे कुटुंबियांचे केले सांत्वन

**लातूर / प्रतिनिधी-** रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे यांचे बंधू स्व. सुनील (काका) मोरे यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी रेणापूर तालुक्यातील पोहरेगाव येथील निवासस्थानी जाऊन मोरे कुटुंबियांची भेट घेऊन मोरे कुटुंबियांचे सांत्वन केले.

यावेळी रेणा सहकारी साखर कारखाना चेअरमन सर्जेराव मोरे, अनिल मोरे, मोहनराव मोरे, बाळकृष्ण मोरे, भरत मोरे, सदानंद शिंदे, ॲड. किरण जाधव, रविंद्र काळे, ड. समद पटेल, विजय देशमुख यांच्या सह मोरे कुटुंबीय उपस्थित होते.

## महागाई रोखण्यासाठी सरकारचा आटापीटा

नवी दिल्ली : सध्या गहू उत्पादक शेतक-यांना अच्छे दिन आले आहेत. कारण गव्हाच्या किंमतीत वाढ झाली आहे. सरकारने यावर्षी गव्हाचे विक्रमी उत्पादन झाल्याचा दावा केला आहे. मात्र, दुसरीकडे गहू आयात करण्याची शक्यता देखील वर्तवली जात असल्याने महागाई रोखण्यासाठी हा सरकारचा आटापीटा असल्याचे बोलल्या जात आहे. देशात नवीन सरकार स्थापन होताच गव्हाची आयात होण्याची शक्यता आहे. गव्हाच्या वाढत्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी गहू आयातीचा निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

गव्हाची दरात सातत्याने वाढ होत आहे. सरकारी खरेदीची प्रक्रिया अद्याप संपलेली नाही आणि सध्या देशांतर्गत बाजारात गव्हाचा भाव २,४३५ रुपये

(पान ५ वर)

# १५१ महिला भजनी मंडळांना साहित्यांचे वाटप

## भाजपाचे आ. कराड यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव




लातूर : भाजपचे आमदार रमेश कराड यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. लातूर ग्रामीण मतदारसंघातील विविध गावातील १५१ महिला भजनी मंडळातील सदस्यांना टाळ, मृदंग, विणा व इतर साहित्याचे वाटप करण्यात आले. रेणापूर आणि लातूर संजय गांधी निराधार योजना समितीच्या वतीने १ हजार विधवा महिलांना साडीचोळीचे वाटप करण्यात आले.

रेणापूर तालुका भारतीय जनता पार्टीच्या वतीने येत्या शैक्षणिक वर्षातील जिल्हा परिषद शाळेतील ११ हजार १११ वह्यांचे वाटप करण्यात येणार असून प्रातिनिधीक स्वरुपात वह्यांचे वाटप करण्यात आले. लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील गावागावात भाजपाच्या कार्यकर्त्यांनी ग्रामदेवतांचा अभिषेक, महापूजा व आरती करून आ. कराड यांना दिर्घायुष्य लाभावे यासाठी प्रार्थना केली. तर अनेक ठिकाणी सर्वरोग निदान शिबीर, रक्तदान शिबीर घेण्यात आले. अभिष्ठचिंतन कार्यक्रम प्रसंगी तुळशीराम कराड, काशिराम कराड, संजिवनीताई कराड, राजेश कराड, ऋशिकेश कराड, पृथ्वीराज कराड, रणवीर कराड उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन चंद्रकांत कातळे यांनी केले. या सोहळ्यास भाजपा नेत्या डॉ. अर्चना पाटील चाकूरकर, माजी खासदार डॉ. सुनिल गायकवाड, विक्रम शिंदे, प्रदिप पाटील खंडापूरकर, माजी आमदार शिवराज तोंडचिरकर, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, अमोल पाटील, शैलेश लाहोटी, विजय क्षीरसागर, महिला आघाडीच्या रागीनी यादव, नवनाथ भोसले, त्र्यंबक गुट्टे, रवि सुडे, भागवत सोट, कुलदिप सूर्यवंशी हनुमंतबापू नागटिळक, पनगेश्र्वर कारखान्याचे किशनराव भंडारे, व्यंकटराव अनामे, ॲड. अरुण चव्हाण, काकासाहेब चौगुले, अनिल भिसे, अनंत चव्हाण, मुनोज कराड, महेंद्र गोडभरले, प्रदिप मोरे, सुकेश भंडारे, चंद्रभान जाधव, काकासाहेब मोरे, मंगेश पाटील, बस्वराज रोडगे, प्रकाश पाटील, ऋषिकेश बद्दे, अशोक बिराजदार आदी उपस्थित होते.



# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी रोजगार निर्मितीसाठी औद्योगिक धोरण आखले :प्रा. पाटील



लातूर / प्रतिनिधी- राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी रोजगार निर्मितीसाठी औद्योगिक धोरण आखले होते तसेच त्या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या असे प्रतिपादन प्रा. वनिता पाटील यांनी केले.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग आणि महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय (जयंती उत्सव समिती आणि महिला विकास समिती), लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची २९९वी जयंती प्राचार्य कक्षात उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई होते. तर यावेळी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. शिवप्रसाद डोंगरे, प्रा. किसनाथ कुडके, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, डॉ. अश्विनी रोडे, प्रा. कल्पना गिराम, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

सर्वप्रथम राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी सर्वांच्या उपस्थितीत पुष्पहार घालून अभिवादन केले.

पुढे बोलताना प्रा. वनिता पाटील म्हणाल्या की, स्वतःची सर्व कामे स्वतःच अहिल्यादेवी होळकर करायच्या. इंदूरच्या होळकर घराण्याने अहिल्यादेवींना सून म्हणून मागणी केली. पतीचे युद्धात निधन झाल्यानंतर सासरे मल्हारराव होळकर यांच्या छत्राखाली राहून अहिल्यादेवी होळकरांनी सहकार्य केले. मल्हार होळकरांचे निधन झाल्यानंतर राज्याची संपूर्ण जबाबदारी अहिल्यादेवी होळकर यांनी अतिशय व्यवस्थितपणे सांभाळून राज्याचा कारभार सुरक्षित पद्धतीने चालविला म्हणून त्यांना राजमाता म्हणून संबोधिले जाते.

या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, प्रशासनामध्ये सामाजिक न्यायाची भावना ठेवली पाहिजे. अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव व्हावा म्हणून केंद्र आणि राज्य सरकारने सोलापूर विद्यापिठाचा नामविस्तार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर असा केला आहे. अहिल्यादेवी होळकर यांनी समानतेचे राज्य केले असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अश्विनी रोडे यांनी केले तर आभार प्रा. कल्पना गिराम यांनी मानले.

या कार्यक्रमाला विनायक लोमटे, रत्नेश्वर स्वामी, पाटील राम, विरसेन उटगे, योगीराज माकने, श्रीशैल्य पाटील, गोपाल तिरमले, महादेव स्वामी, रंगनाथ लांडगे व महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी आदी उपस्थित होते.

# ग्रीन लातूर वृक्ष टीमवर कौतुकाचा वर्षाव

## अखंड १८२७ दिवस म्हणजे पूर्ण पाच वर्ष श्रमदान करण्याचा आगळावेगळा विक्रम

लातूर / प्रतिनिधी- लातूरच्या वेड्या तरुणांनी रचला इतिहास दुष्काळी लातूर, ज्या ठिकाणी रेल्वेने पाणी आणलं होत ही प्रतिमा पुसून हरित लातूर ही नवी ओळख निर्माण करून दिली.

ग्रीन लातूर वृक्ष टीम हे नाव असलेल्या टीम सदस्यांनी सातत्याने सलग १८२७ दिवस, एकही दिवस सुट्टी न घेता हो दररोजच्या दररोज चार तास कार्य करत या ध्येय वेड्या लोकांनी पाच वर्षांत चक्क एक लाख साठ हजार लहान मोठी झाडे स्व:हातांनी लावून जगवली आहेत. त्याबरोबरच शहरातील इतर झाडे सुद्धा जगवली. झाडे लावल्या नंतर ते थांबले नाहीत त्या झाडांना दररोज पाणी देण्यासाठी ५ लहानमोठी टँकर भाड्याने घेतली.

या उन्हाळ्यात देखील दररोज सरासरी ५-६ टँकर पाणी वापरून झाडे जगवली जात आहेत. पाण्यावाचून एकही झाड वाळू दिले नाही.



मंदिर, मज्जीद, स्मशानभूमी, कबरस्थान, रस्ता दुतर्फा, रस्ता दुभाजक, शाळा, कॉलेज, महाविद्यालय, बस स्थानक परिसर, रेल्वे स्टेशन, पोलीस स्टेशन, पोलीस अधीक्षक कार्यालय, महापुरुषांची पुतळ्यांचा परिसर, महावितरण कार्यालयांची ऑफिस, न्यायालय, पशू वैद्यकीय चिकित्सालय ऑफिस , आय टी आय , महिला तंत्रनिकेतन, ईरीगेशन कॉलनी, अनेक ग्रीन बेल्ट, महापूर मांजरा नदीतील बेट, भातांगळी मांजरा नदीकाठी शेकडो बांबू झाडे, अशा विविध ठिकाणी असंख्य झाडे लावून झाडे जगवली. ठिकठिकाणी सुंदर असे बगीचे तयार करून दिले. १४ -१५ ओसाड उनाड जागेवरती घनदाट वन प्रकल्प उभे केले. प्रचंड मेहनत, प्रचंड श्रम, प्रचंड कष्ट घेत दररोज चार तास श्रमदान करत ग्रीन लातूर वृक्ष टीमच्या या ध्येयवेड्या तरुणांनी लातूर शहर अल्पावधीत हरित करून टाकलं. आज उंच उंच गेलेली झाडे, मोठी झालेली झाडे, झाडाखाली सावलीमध्ये व्यवसाय करणारे लोक, झाडाखाली सावलीमध्ये लावलेली वाहने, उन्हाळ्यात शहरातील कमी झालेले तापमान ही सगळी यांच्या कष्टाची पावती आहे. २०२४ च्या उन्हाळ्यात इतर शहरांच्या तुलनेत तापमान चक्क तीन (३) अंशाने कमी होतं. या टीम मध्ये डॉक्टर, वकील, सीए, इंजिनियर, पत्रकार, नगरसेवक, प्रगतशील शेतकरी, आय.टी. इंजिनियर, विद्यार्थी, विद्यार्थिनी, महिला, पोलीस, उद्योजक, शिक्षक, प्रोफेसर, बँक मॅनेजर या पद्धतीने सर्व स्तरातील व्यक्ती आहेत. ८० जणांची असलेली ही टीम दररोज १५ ते २० जणांना एकत्र येऊन रोटेशन पद्धतीने चार तास श्रमदान करते. लातूरमध्ये झालेला बदल, हरित वृक्षक्रांती प्रत्यक्ष डोळ्यांनी सर्वजण अनुभवत आहेत. नुसतं झाड लावून झाड जगवणं हे एकच कार्य न करता स्मशानभूमी स्वच्छता, रस्ता दुभाजक स्वच्छता, कॅरीबॅग निर्मूलन, प्लास्टिक निर्मूलन, कचरा पेटवू नये विरुद्ध आंदोलन, इको ब्रिक्स, कापडी पिशव्यांचे वाटप, पोस्टर फ्री लातूर, बीजगोळे, बियांचे पॅकेट वाटप, विविध प्रसंगी फुलझाडे वाटप, दुर्मिळ बिया संकलन, दुर्मिळ आयुर्वेदिक झाडांचे रोपण, झाडांचे पुनश्च रोपण, झाडांचा कट्टा, वृक्षतोडीचा विरोध करण्याकरिता विविध पद्धतीने आंदोलने असे विविध उपक्रम यांनी राबवलेले आहेत. सोबतच बाग परीक्षण, उत्कृष्ट बाग स्पर्धा, बोन्साय बनवणे कार्यशाळा, कुंडीमध्ये माती भरणे कार्यशाळा अशी विविध उपक्रम सुद्धा यांनी घेतलेले आहेत. विशेष म्हणजे हे सर्वजण स्वयंस्फूर्ती ने कार्य करतात. या चळवळीस कुणीही अध्यक्ष किंवा पदाधिकारी नाहीत.

कडुनिंब झाड अध्यक्ष व इतर झाडे सदस्य आहेत. हे सर्व करताना इतर त्रासही खूप झाला पण त्याकडे दुर्लक्ष करत या सदस्याने आपला हा अद्भुत असा प्रवास सुरूच ठेवला. या यशस्वी प्रवासाबद्दल डॉ. कल्याण बरमदे, डॉ. नंदकुमार डोळे, डॉ. विमल डोळे, लॉयन राजेश मित्तल, डॉ. शांतीलाल शर्मा, डॉ. अशोक पोद्दार, प्रा. आयेशा सिद्दिकी, प्रा. श्री वेद पाठक, डॉ. जयंत पाटील इत्यादींनी शुभेच्छा दिल्या.



चाकूर येथे बालाजी पाटील मित्रमंडळ आयोजित २२ वा सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. या शुभ प्रसंगी उपस्थित राहून नव दांपत्यास भावी वैवाहिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित माजी खा सुनिलजी गायकवाड, मा आ बब्रुवान खंदाडे, सद्गुरु सदानंद महाराज मुदगडकर, पाणीपुरवठा सभापती श्री भागवत जी फुले, श्री सुहासजी काटे, मा जि प सदस्य श्री सज्जनजी लोणावळे, श्री अभिमन्यू धोंडगे, ॲड .श्री युवराज पाटील, श्री बालाजी सूर्यवंशी, श्री उत्तमजी वाघ, श्री पवन कांबळे, श्री चेतनजी महालिंगे,मा नगरसेवक श्री संगीत रंदाळे, श्री शैलेशजी स्वामी, श्री नितीनजी कल्याणी, आदी उपस्थित होते.

### कम्बाईड डिफेन्स सर्व्हीसेसच्या पूर्व तयारीसाठी प्रशिक्षणाचे आयोजन

लातूर, / प्रतिनिधी- सीडीएस कोर्स क्र. ६२ साठी कम्बाईड डिफेन्स सर्व्हीसेसच्या पूर्व तयारीसाठी महाराष्ट्र शासनामार्फत छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, विभागीय आयुक्त कार्यालय परिसर, नाशिकरोड येथे प्रशिक्षण वर्ग चालवण्यात येणार आहे. प्रशिक्षण कोर्सचा कालावधी १० जून २०२४ ते २३ ऑगस्ट २०२४ पर्यंत (एकुण ७५ दिवस) आहे.

प्रशिक्षण कालावधीत निवासाची, प्रशिक्षणाची व भोजनाची सोय विनामुल्य करण्यात आलेली आहे. ङ्गसीडीएसफ्साठी ऑनलाईन फॉर्म भरलेल्या युवक-युवतींनी अधिक माहितीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, लातूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (निवृत्त) यांनी एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# थकीत करापोटी ६ गाळ्यांना ठोकले सील

लातूर/प्रतिनिधी: थकित मालमत्ता करापोटी मनपाने वसुली मोहीम तीव्र केली असून गुरुवारी रोजी ६ गाळ्यांना सील ठोकण्यात आले. पालिकेने ५ लाख रुपयांचा करही वसूल केला.

मनपाच्या मालकीची शहरात व्यापारी संकुले आहेत.या संकुलातील कांही गाळेधारकांनी मालमत्ता कर थकवला आहे.या गाळेधारकांकडे असणारा कर वसूल करण्यासाठी पालिकेने ही विशेष वसुली मोहीम सुरु केली आहे.

मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या आदेशान्वये मंगळवार दिनांक ३० मे रोजी वसुली पथकाने एकूण ०६ गाळे सील करून ५ लाख रुपयांचा कर वसूल केला.



मनपाच्या मालकीच्या सारोळा रोड येथील व्यापारी संकुलातील चार गाळे सील करण्यात आले. गांधी मैदान साईट क्रमांक १११ व ११२ व्यापारी संकुलातील दोन गाळे पथकाने सील केले.या व्यापारी संकुलात २ लाख रुपयांचा कर वसूल झाला. तसेच गांधी चौक व्यापारी संकुल येथील गाळेधारकांकडून ३ लाख रुपयांचा कर वसूल झाला.

शहरातील व्यापारी संकुलात असणाऱ्या ज्या गाळेधारकांकडे थकबाकी आहे त्यांनी आपल्याकडील बाकीचा भरणा तात्काळ करून मनपाला सहकार्य करावे. जे गाळेधारक थकबाकी भरणार नाहीत त्यांच्यावर याच पद्धतीने कार्यवाही केली जाईल,असा इशाराही उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांनी दिला आहे.

# राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना आमदार धिरज देशमुख यांचे अभिवादन



लातूर प्रतिनिधी : राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आज लातूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याला आमदार धिरज विलासरावजी देशमुख यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी अहिल्यादेवी होळकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने यावेळी आमदार धिरज विलासरावजी देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सेवानिवृत्त जिल्हाधिकारी मा.गो. मांडुरके, महाराष्ट्र विकास आघाडीचे अध्यक्ष ॲड. अण्णाराव पाटील, उद्योजक चंद्रकांत धायगुडे, लातूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव, रेणापूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रमोद जाधव, लातूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष सुभाष घोडके, लातूर जिल्हा बँकेचे माजी संचालक संभाजी सूळ, बँकेचे संचालक अनुप शेळके, बाळकृष्ण धायगुडे, एकनाथ पाटील, बंडू किसवे, आनंद पाटील, राजकुमार पाटील, विष्णूदास धायगुडे, रमाकांत गडदे, मुन्ना राजे, धनंजय देशमुख, शुभम पडूळकर, सुभाष लवटे, राजपाल भंडे, ॲड. मंचकराव डोणे, हरिभाऊ काळे, शिवाजी बैले, दगडुसाहेब हजारे, प्रा. सुरेश वाघमारे, गोपाळ बुरबुरे, राजाभाऊ मदने, संपत गंगथडे, ॲड कर्डीले, सुजित वाघे, प्रा. भंडे, ॲड कवितके, राम गोरड, विशाल देवकते आदी उपस्थित होते.

# वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात अहिल्याबाई होळकर जयंती व कायदा जाणीव जागृती शिबिर संपन्न

देगलूर (प्रतिनिधी) : वैकुंठवासी धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय देगलूर व पोलीस स्टेशन देगलूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात ३१ मे २४ रोजी अहिल्याबाई होळकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली तसेच याप्रसंगी कायदा विषयक जाणीव जागृती शिबिरही संपन्न झाले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. संजय अवधाने, उपप्राचार्य डॉ. दिलीप भडके तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून



पोलीस निरीक्षक व्ही. के. झुंजारे, सहाय्यक पोलीस निरीक्षक ए. डी. पवार, हेड कॉन्स्टेबल सुनील पत्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रथम अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. पोलीस निरीक्षक झुंजारे यांनी दिनांक १ जुलै २४ पासून कायद्यामध्ये होऊ घातलेल्या विविध बदलांविषयी (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, न्याय संहिता, साक्ष संहिता बद्दल) माहिती दिली तसेच विद्यार्थ्यांनी विधायक मार्गाचा अंगीकार करून आपल्या करिअरवर लक्ष केंद्रित करावे असे आवाहन याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

सत्य, प्रामाणिकपणा कर्तव्यनिष्ठा इत्यादी बाबी कायद्यामध्ये प्रतिबिंबित होत असतात असे मत प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांनी व्यक्त करून अहिल्याबाई होळकर यांच्या राजकीय कारकीर्दीवर अध्यक्षीय समारोपातून प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. संजय अवधाने यांनी केले तर आभार उपप्राचार्य डॉ. दिलीप भडके यांनी मानले.

# दिल्लीतील पाणी प्रश्न सर्वोच्च न्यायालयात

नवी दिल्ली : दिल्लीतील भीषण पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर आप सरकारने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. हरियाणाला अधिक पाणी देण्याच्या सूचना द्याव्यात, अशी विनंती दिल्ली सरकारने सर्वोच्च न्यायालयात केली. तर मुख्यमंत्री केजरीवाल यांनीही भाजपशासित राज्यांना अधिक पाणी देण्याचे आवाहन केले. दरम्यान, आप आणि टँकर माफीया यांच्यात साटेलोटे असल्यामुळे दिल्लीत कृत्रिम पाणीटंचाई तयार झाल्याचा हल्लाबोल भाजपने केला आहे.

दिल्ली आणि हरियाणा सरकारमध्ये पाण्यावरून वाद सुरू असताना आता दिल्लीतील पाणीसंकट तापल्यानंतर दिल्ली सरकारने आज सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. सोबतच मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी सोशल मीडियाद्वारे पाणीटंचाईच्या मुद्द्यावर सरकारची भूमिका मांडताना भाजपला राजकारण न करण्याचे आवाहन केले. सोशल मीडिया एक्सवर केजरीवाल यांनी म्हटले, की भाजपचे मित्र विरोध करत आहेत. मात्र यामुळे प्रश्न सुटणार नाही.

भाजपने हरियाणा आणि उत्तर प्रदेशातील आपल्या सरकारांकडून सरकारकडून दिल्लीला महिनाभर पाणी मिळवून दिल्यास, दिल्लीकरांना मोठा दिलासा मिळेल. गेल्या वर्षी दिल्लीत विजेची सर्वाधिक मागणी ७४३८ मेगावॅट होती. त्या तुलनेत यंदा सर्वाधिक मागणी ८३०२ मेगावॅटवर पोहोचली आहे असे असूनही दिल्लीतील विजेची परिस्थिती नियंत्रणात आहे. दिल्लीत इतर राज्यांसारखी वीज कपात नाही. मात्र, पाण्याची मागणी खूप वाढली आहे. आणि शेजारच्या राज्यांमधून दिल्लीला होणारा पाणीपुरवठा कमी झाला आहे असाही दावा मुख्यमंत्री केजरीवाल यांनी केला.

दरम्यान, पाणीसंकटाचा मुकाबला करण्यासाठी आप सरकारने वॉटर टँकर वॉर रूम तयार केली आहे. या वॉररुमच्या माध्यमातून दिल्लीकरांना १९१६ वर कॉल करून टँकर मागवता येईल. तसेच पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी जलबोर्डातर्फे २०० भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे.

# वर्ड नो टोबॅको डे : रोजचाच दिवस असू दे...तंबाखू विरोधी दिवस!

तोंडाचा कॅन्सर, कर्करोग म्हटलं की सर्वसामान्य माणसाचं धैर्य पुर्णतः खचून जातं ... व तो सगळं संपलं या निरर्थक विचारांच्या अधिन होतो. कॅन्सर.... मग तो कुठलाही असो .... त्याचं वेळीच निदान झालं अन त्यावर योग्य ठिकाणी यथायोग्य उपचार झाले तर इतर व्याधींसारखचं यावर देखील आपण विजय मिळवू शकतो. गरज असते ती एका .... स्विकाराची आणि निर्णयाची.... भारतात होणाऱ्या एकूण कॅन्सरच्या प्रकारांपैकी तोंडाच्या कर्करोगाचे हे प्रमाण एक तृतीयांश टक्के आहे. दरवर्षी आपल्या भारत देशामध्ये ७५००० मृत्यू या कर्करोगामुळे होतात. धक्कादायक बाब म्हणजे यामध्ये तरुण लोकांचं प्रमाण लक्षणीय आहे.

काय आहेत कारणं : तोंडाचा कर्करोग हा प्रामुख्याने ओठ, जीभ, हिरड्या, गालाच्या आतील बाजूस होतो किंवा तोंडात कोठेही जखम, गाठ असेल तर याची हि सुरुवात समजावी. गुटखा, सिगारेट व तस्यम पदार्थांमधून तंबाखूचे सेवन हे तोंडाच्या कर्करोगाचे प्रमुख कारण आहे.

काय आहेत लक्षणं:

तोंडाचा कर्करोग झाल्यानंतर तोंडात गालाच्या आतल्या बाजूला फोड येतो. ज्याला आपण तोंड येणे असे देखील म्हणले जाते. त्याचबरोबर तोंडात इजा होणे, ओठ फाटणे आणि जखम सहजसाहजी न भरणे अशी सामान्य लक्षणे दिसायला लागतात. तोंडाचा कर्करोग होताना सुरूवातीस तोंडाच्या आतल्या बाजूला पांढरा फोड येतो. जर तोंडात बराच काळ पांढरा डाग, जखम, तोंड आलं असेल, तर तोंडाचा कर्करोग होण्याची शक्यता आहे.

- त्याचबरोबर तोंडातून दुर्गंध येणे, आवाज बदलणे, आवाज बसणे, काही गिळण्यात त्रास होणे, जास्त लाळ किंवा रक्त येणे, ही देखील तोंडाच्या कर्करोगाची लक्षणे आहेत. यामध्ये जखमा, सूज, रक्तस्त्राव, जळजळ, तोंडात दुखणे अशी लक्षणे दिसतात.

- एक किंवा अधिक दातांमध्ये विनाकारण कमकुवतपणा येणे किंवा ते पडणे हे देखील कर्करोगाचे लक्षण असू शकते. तसंच जर दात काढला असेल आणि त्या जागचा खड्डा भरत नसेल तर तुम्ही ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधायला हवा. तोंडाच्या कर्करोगाचा उपचार शस्त्रक्रिया, रेडिएशन आणि केमोथेरपीसह अनेक प्रकारे केला जातो. शिवाय हे उपचार त्या व्यक्तीचे वय, आरोग्याची स्थिती आणि स्टेजवर अवलंबून असतात.

- हिरड्या, जीभ टॉन्सिल किंवा तोंडावर लाल आणि पांढरे डाग उठणे हे धोकादायक ठरु शकते. या स्थितीला ल्युकोप्लाकिया असे म्हणतात. बहुतेक ल्युकोप्लाकिया पॅच नॉन -कॅन्सरचे असतात. परंतु, बऱ्याच कर्करोगाचे हे लक्षणे असू शकते. जे तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे होऊ शकते.

इतर जोखीम घटक : मौखिक स्वच्छता दातांची जळजळ ह्युमन पॅपिलोमा व्हायरस इंफेक्शन मधुमेह इम्युन्योसप्रेसिव्ह ओषधांचा मोठ्या प्रमाणात वापर प्रतिबंध : तंबाखूचे सेवन करणारी व्यक्ती ही स्वतःसाठी आणि समाजासाठीही धोकादायक असते. धूम्रपान करणाऱ्या आणि तंबाखू खाणाऱ्या लोकांमुळे होणाऱ्या पर्यावरणीय प्रदूषणाचा परिणाम तंबाखू न खाणाऱ्या व्यक्तीवरही होतो. तंबाखू सेवन हा आजार आहे. त्यावर उपचार करावे लागतात. तंबाखू बंद करण्यासाठी योग्य योजना आवश्यक आहे.

या गोष्टींची घ्या काळजी: धूम्रपान करू नका, कर्करोगाच्या सुरुवातीच्या लक्षणांसाठी तुमची तोंडाची नियमितपणे तपासणी करावी. तुमच्या दातांच्या डॉक्टरांना नियमित भेट द्या, तोंडात जखम झाली असेल तर ताबडतोब तपासणी करून घ्या

उपचार: कॅन्सर जर पहिल्या किंवा दुसऱ्या स्टेजमध्ये असेल तर सामान्यपणे शस्त्रक्रिया (सर्जरी) करून कॅन्सर काढून टाकण्याला प्राधान्य दिले जाते. मानेमध्ये गाठी असतील तर त्याही काढून टाकल्या जातात. यामध्ये रुग्णांच्या जीभ, जबडे, गाल या अवयांची झालेली हानी आधुनिकपद्धतीने (रीकन्स्ट्रक्शन) प्लास्टिक सर्जनच्या मदतीने इतर अवयवांचा वापर करून भरून काढली जाते. या मध्ये मनगटावरील त्वचा व नाडीच्या रक्तवाहिन्यांपासून नवीन जीभ किंवा गाल बनवणे, पायातील पिंढारीच्या हाडापासून नवीन जबडा बनवणे तसेच त्यावर दांत रोपंण करणे संभव आहे. यालाच ऑन्कॉप्लास्टिक सर्जरी म्हणतात. चेहरा कुठल्याही परिस्थितीत विद्रुप होणार नाही किंवा या कर्करोगाचा परिणाम जाणवणार नाही हि देखील काळजीघेतली जाते. तिसऱ्या स्टेजमधील कॅन्सरमध्ये ऑपरेशन नंतर रेडिएशन ची गरज भासते. रेडिएशनच्या माध्यमातून आजार परत येण्याची शक्यता कमी करता येते. कॅन्सरच्या चौथ्या स्टेजमध्ये केमिओथेरपी चा उपचार दिला जातो या स्टेजला मात्र रुग्णाचे आयुष्य कसे वाढवता येईल याचाच विचार करावा लागतो. शेवटी आजाराची व्याप्ती व खोली यावरच उपचारांचे भवितव्य अवलंबून असते. यास्तव वेळीच जागे होऊन वर नमूद केलेली तोंडाच्या कॅन्सरची लक्षणे आपल्याला थोड्याफार प्रमाणात जरी जाणवत असतील तर जराही वेळ न दवडता सजगतेने तज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा... हे मात्र नक्की .... !



-डॉ. शितल चापोलीकर
दंतचिकीत्सक

# यशवंत धाराशिव जिल्हा

शनिवार दि. ०१ जून २०२४

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com




## भोसले हायस्कूलमध्ये होळकर जयंती साजरी

धाराशिव दि.३१ (प्रतिनिधी) – येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती साजरी करण्यात आली. संस्था अध्यक्ष सुधीर पाटील यांच्या हस्ते होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच अहिल्याबाई होळकर यांच्या कार्यावर आपले विचार व्यक्त केले. यावेळी प्रशालेचे प्राचार्य नंदकुमार नन्नवरे, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, पर्यवेक्षक सुनील कोरडे, धनंजय देशमुख, ज्येष्ठ शिक्षक



एच.एस. ठेले, आर.पी. पवार, बी.टी. गवळी, विश्वास शेवाळे, ए.सी. माढे, महेश देशमुख, ऋषीकेश शिंदे व शिवकुमार लगाडे आदी उपस्थित होते.

# केंद्र सरकारने पीक विमा देण्यासाठी ३० एप्रिल रोजी काढलेले परीपत्रक कंपनी धार्जिणे

## उर्वरित रक्कम पेरणी आदी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी

केंद्र सरकारने काढलेल्या परिपत्रकामुळे पिक विमा कंपनीला ३०० कोटी रुपयांपेक्षा जास्त फायदा फक्त एका खरीप हंगामात झाला असल्याचा आरोप आ कैलास पाटील यांनी केला. आचारसंहिता असताना केंद्राने हे परिपत्रक का काढले याचे स्पष्टीकरण द्यावे अशी मागणी करीत ते म्हणाले की, १३०० कोटी रुपये विमा मिळवून देणे गरजेचे होते. याबाबत बैठक घेणे अपेक्षित होते. मात्र आचारसंहिता असल्याचे कारण सांगितले जाते. मग परिपत्रक काढताना आचारसंहिता नव्हती का ? असा सवाल ही त्यांनी उपस्थित केला. तसेच एका मंडळामध्ये १२ पीक कापणी प्रयोग करून त्यानुसार आणेवारी काढली जाते. तर ६१ टक्के क्षेत्रावर नुकसान झाल्याच्या सूचना शेतकऱ्यांनी दिल्या असताना याकडे दुर्लक्ष का केले ? त्यामुळे उर्वरित २२ हजार रुपये पेरणी आधी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावेत अशी मागणी आ पाटील यांनी केली.

नगर परिपत्रकानुसार पीक विमा भरलेल्या ७५ टक्के शेतकऱ्यांना न्याय मिळणार नाही. पिक विमा भरताना जे परिपत्रकान्वये नुकसान भरपाई देणे अपेक्षित आहे. ती रक्कम तात्काळ विमा कंपनीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी. जिल्ह्यातील ५७ महसूल मंडळापैकी ३२ महसूल मंडळातील शेतकऱ्यांना रक्कम मिळालेली नाही. विशेष म्हणजे राज्याच्या कृषिमंत्र्यासोबत दि.२३ जुलै २०२३ रोजी घेतलेल्या बैठकीत पंचनामेच्या प्रति देण्याचे आदेश दिले होते मात्र त्या दिल्या नसल्याचे अनिल जगताप यांनी सांगितले.





केंद्र सरकारने शेतकऱ्याकडून पीक विमा हप्ता भरून घेताना जो करार परिपत्रकांवर केला आहे. तो करा र एका बाजूला ठेवून नवीन परिपत्रक काढून जुन्यामधील सूत्र बदलून मूळ सूत्राला विसंगत असे परिपत्रक काढले आहे. हे परिपत्रक बेकायदेशीर असल्यामुळे ते रद्द करावे अशी मागणी मकरंद राजेनिंबाळकर यांनी केले. तसेच आचार संहिता असताना शेतकऱ्यांवर अन्याय करण्यासाठी हे पत्र काढताना अडचण आली नाही का ? असा सवाल करीत या विरोधात पायऱ्या पायऱ्याने लढाई लढणार असल्याचा इशारा त्यांनी दिला.

धाराशिव दि.३१ (प्रतिनिधी) – २०२३ मधील खरीप हंगामाच्या पीक विम्यापोटी हप्ता भरून घेण्यासाठी ज्या परिपत्रकांमुळे करार करण्यात आले होते. त्या परिपत्रकातील नियम व अटीनुसार पिकांच्या नुकसान झालेल्या नुकसानीची रक्कम शेतकऱ्यांना पीक विमा कंपनीने देणे अपेक्षित व बंधनकारक आहे. मात्र पीक विम्याची रक्कम जास्ती असल्यामुळे केंद्रातील मोदी सरकारने लोकसभेची आचारसंहिता असताना दि.३० एप्रिल रोजी शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम देण्यासाठी खास परिपत्रक काढले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम मिळणे तर सोडाच उलट शेतकऱ्यांनाच पीक विमा कंपनीला पैसे द्यावे लागतील अशी त्यामध्ये तरतूद केली आहे. विशेष म्हणजे हे परिपत्रक फक्त आणि फक्त महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांसाठी लागू असल्यास मुळे भाजप सरकारचे पुन्हा महाराष्ट्रातील शेतकरी विरोधी धोरण असल्याचे दिसून आले आहे. तसेच हे परिपत्रक शेतकरी विरोधी व कंपनी धार्जिणे असल्याचा सनसनाटी आरोप खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर व आ कैलास पाटील यांनी आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत दि.३१ मे रोजी केला.

धाराशिव शहरातील पवनराजे कॉम्प्लेक्समध्ये आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी माजी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर, अनिल जगताप व शिवसेना शहरप्रमुख सोमनाथ गुरव आदी उपस्थित होते. पुढे बोलताना खा राजेनिंबाळकर म्हणाले की, केंद्र सरकारने आचारसंहिता असताना देखील कंपनीचे पैसे वाचविण्यासाठी हे परिपत्रक काढले आहे. तर राज्य सरकारने दि.६ मे रोजी परिपत्रक काढत त्याची अंमलबजावणी केल्याचा आरोप त्यांनी केला. कारण जुन्या परिपत्रकांमुळे शेतकऱ्यांना फायदा झाला असता असे सांगत भाजप सरकार शेतकऱ्यांचा किती द्वेष करते ? याचे हे उदाहरण असल्याचे त्यांनी नमूद केले. जिल्ह्यातील ५ लाख ५६ हजार शेतकऱ्यांनी २०२३ चा पीक विमा भरला असून २७०० कोटी रुपये पीक संरक्षीत केली आहे. जिल्ह्यातील ३ तालुके दुष्काळी तर उर्वरित मंडळामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण असल्याचे शासनाने जाहीर केले आहे. त्यामुळे विमा भरलेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी २७ हजार रुपये मिळणे हा त्यांचा हक्क आहे. मात्र सरकारने फक्त ३७ हजार ५५४ शेतकऱ्यांना ३९ कोटी रुपये वितरित केले असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच विमा कंपनीबाबत तत्परता व सर्व सामान्य शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणी पुसणाऱ्या मोदी सरकारचा निषेध देखील त्यांनी केला. तर विशेष म्हणजे विमा स्पेशलिस्ट असलेल्या व्यक्तीने फेसबुकवर १ लाख ९२ हजार शेतकऱ्यांना पीक विमा रक्कम मिळणार असल्याचे सांगितले. परंतू उर्वरित शेतकऱ्यांना पीक विमा मिळाला नसल्याचे सांगत याचे श्रेय कोण घेणार ? असा टोला नाव न घेता आ राणाजगजितसिंह पाटील यांना लगावला.

## जिल्हा सराफ सुवर्णकार (असो) च्या जिल्हाध्यक्षपदी माळी तर सचिवपदी जालनेकर

धाराशिव दि.३१ (प्रतिनिधी) – धाराशिव जिल्हा सराफ सुवर्णकार फेडरेशन (असो) च्या जिल्हाध्यक्षपदी दत्ता माळी (गोरे) यांची तर सचिवपदी मयुर जालनेकर यांची निवड करण्यात आली आहे.





धाराशिव जिल्हा सराफ सुवर्णकार फेडरेशन (असो) च्या जिल्हा कार्यकारणीची निवड करण्यासाठी धाराशिव तालुक्यातील येडशी येथील गणेश हॉलमध्ये बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये फेडरेशन (असो) चे मराठवाडा अध्यक्ष गणेश बेंद्रे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यामध्ये जिल्हा कार्याध्यक्ष (शहर) कृष्णा डहाळे यांची तर ग्रामीण जिल्हा कार्याध्यक्षपदी विजयकुमार इखे यांची तसेच उमरगा उपाध्यक्षपदी क्षितीज शिरशीकर, संभाजी पोतदार व अजित नाईक यांची तसेच मुख्य उपाध्यक्षपदी संभाजी पोतदार व राघवेंद्र पोतदार यांची तर कोषाध्यक्षपदी सच्चिदानंद पोतदार यांची व जिल्हा संपर्कप्रमुखपदी मनोज चिंतामणी यांची तसेच संघटकपदी राजेश कदम व सहसंघटकपदी श्रीकृष्ण नाईकनवरे यांची तसेच मुख्य मार्गदर्शक म्हणून विष्णुदास सारडा, मल्हारी ओमासे, सुदाम खाडे, किशोर गोरे, अभिजीत पेडगावकर, अजित नाईक तसेच निवड करण्यात आली आहे. तसेच कायदेविषयक समितीच्या जिल्हाध्यक्षपदी तानाजी मुंडे यांची तर उपाध्यक्षपदी विनोद चिंतामणी व सचिवपदी अनिल पंडित यांची निवड करण्यात आली. या बैठकीस जिल्ह्यातील जिल्हा सराफ सुवर्णकार फेडरेशन (असो) चे सर्व पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परंडा येथे पुण्यश्लोक होळकर यांची जयंती साजरी



परंडा दि.३१ (प्रतिनिधी) – डी.बी.ए समुह कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची २९९ वी जयंती मोठ्या उत्साहात दि.३१ मे रोजी साजरी करण्यात आली.

परंडा शहरातील कुर्डुवाडी रोडवरील डीबीए समुहाच्या कार्यालयात कुर्डूवाडी संस्थापक अध्यक्ष दयानंद बनसोडे, माजी नगराध्यक्ष झाकीर सौदागर व राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष राहुल बनसोडे यांच्या हस्ते होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून इयत्ता दहावी शालांत परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनीचा सत्कार करण्यात आला.

यावेळी समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष बिभिषन खुणे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार ओबीसी सेलचे जिल्हा कार्याध्यक्ष डॉ. नवनाथ वाघमोडे, प्रहार संघटनेचे तालुकाध्यक्ष आप्पासाहेब तरटे, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष समाधान खुळे, राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा सरचिटणीस घनश्याम शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब ओहाळ, खय्यूम तुटके, तालुका कार्याध्यक्ष रंगनाथ ओव्हाळ, पांडुरंग मुसळे, खानापूरचे पोलीस पाटील दिलीप परिहार, ॲड दयानंद धेंडे, दाजी मारकड, राजेंद्र बनसोडे, बौधाचार्य महावीर बनसोडे, दत्तात्रय पाटील, सिताराम नरोटे, पैलवान मनोज पिंपरकर, रणधीर मिसाळ, नागेश थोरात, स्वप्नील पौळ, समाधान ओव्हाळ, शकुंतला जकाते, भारत जाधव, मुद्दू पटेल, खानापूरचे सरपंच चंद्रकांत परिहार, धम्म संदेश, दिलीप परिहार, ओंकार कुमार बनसोडे, मानसी चौथमहाल, राहुल सिध्दार्थ उबाळे, सुप्रिया कुमार बनसोडे, यश घनश्याम शिंदे , सांकृत्य बनसोडे, आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त रक्तदान, नेत्र तपासणी शिबीर

धाराशिव दि.३१ (प्रतिनिधी) – राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान व नेत्र तपासणी शिबीर घेण्यात आले.

अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन शिवसेना (शिंदे) ओबीसी, व्हीजेएनटीचे महाराष्ट्र प्रदेशअध्यक्ष बाळाप्रसाद किसवे, शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी ओबीसी व्हीजेएनटी जिल्हाध्यक्ष कमलाकर दाने, विलास लोकरे, नागेश जगदाळे, प्रवीण पवार, सादिक तांबोळी, अशोक सोलंकर, नितीन देवकते, पिंटू देवकते, शिवसेना शहर संघटक रणजीत चौधरी, अतुल इंगळे, रामेश्वर घोगरे, आबा देवकते, महादेव वाढकर, संतोष देवकते, रवी देवकते, बालाजी सूर्यवंशी, किरण सोलंकर, अक्षय शेंडगे, शुभम पांढरे, सागर कदम, योगेश तुपे, गणेश जाधव, अक्षय माळी, बबलू वंढरे, मयूर माळी, व धनगर समाज बांधव उपस्थित होते. यावेळी या शिबिरात अनेकांनी रक्तदान केले तसेच मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. यावेळी गरजूंना मोफत चष्माचे व औषधांचे वाटप करण्यात आले.

## सेवानिवृत्ती निमित्त डॉ. बिराजदार यांचा सपत्नीक सत्कार

मुरुम दि.३१ (प्रतिनिधी) – येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विषयाचे प्राध्यापक डॉ. अरविंद आण्णाराव बिराजदार व मलम्मा अरविंद बिराजदार यांचा सपत्नीक सेवानिवृत्ती निमित्त सत्कार सोहळा श्री माधवराव पाटील महाविद्यालयात दि.३१ मे रोजी



करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक सपाटे यांच्या हस्ते डॉ. अरविंद बिराजदार यांचा सपत्नीक फेटा, शाल, पुष्पहार घालून यथोचित सत्कार करण्यात आला. प्रारंभी कै.माधवराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करुन सोहळ्यास प्रारंभ करण्यात आला. यावेळी श्री माधवराव पाटील महाविद्यालयाचे डॉ. रवी आळंगे, डॉ.अविनाश मुळे, डॉ.सुजित मटकरी, डॉ.सोमनाथ बिराजदार, डॉ. अविनाश बिराजदार, डॉ.सुभाष हुलपल्ले, डॉ. भिलशिंग जाधव, प्रा गोपाळ कुलकर्णी, प्रा राजीव शाळु, सेवानिवृत शिक्षक ज्ञानेश्वर वाघमारे, प्रा.राजेद्र वाकडे, प्रा.राजेश दलाल आदींसह श्री माधवराव पाटील महाविद्यालय, प्रतिभा निकेतन कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री क्षेत्र खंडोबा देवस्थानचे मानकरी करणार पुन्हा १० जूनपासून आमरण उपोषण

धाराशिव दि.३१ (प्रतिनिधी) – कळंब तालुक्यातील दहीफळ येथील श्री क्षेत्र खंडोबा देवस्थान मंदिर परिसरातील अनधिकृत अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी व अतिक्रमण काढण्यास हलगर्जीपणा करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी श्री शेत्र खंडोबा देवस्थानचे मानकरी दि. १० जूनपासून आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा दि.३१ मे रोजी दिला आहे.

श्री क्षेत्र खंडोबा देवस्थान हे दहिफळ येथील ग्रामदैवत असून या मंदिराला क तीर्थक्षेत्र देवस्थानचा दर्जा आहे. मंदिर परिसरातील अतिक्रमण काढावे यासाठी ३० नोव्हेंबर २०२३ रोजी श्री खंडोबाच्या मानकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण केले. उपोषण केल्यानंतर कळंब पंचायत समितीचे गट विकास अधिकारी व ग्रामपंचायत कार्यालय दहिफळ यांनी १ महिन्याच्या आत अतिक्रमण प्रक्रिया राबवून पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिले होते. परंतू भूमी अभिलेख कार्यालयाची मोजणी होऊन ६ महिने पूर्ण झाले अतिक्रमांच्या बाबतीत ग्रामपंचायत कार्यालयाने कोणतीही हालचाल केलेली नाही. फक्त चाल ढकलपणा करण्याचे काम ग्रामपंचायत कार्यालय करत असल्याचे दिसून येत आहे. तसेच वरिष्ठ कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकरणाकडे दुर्लक्ष केले की काय ? असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

श्री क्षेत्र खंडोबा देवस्थान ची चंपाषष्ठीला सटीची मोठी यात्रा असते. मंदिर परिसरात झालेल्या अतिक्रमणामुळे २०२२ च्या यात्रेतील धार्मिक कार्यक्रम करते वेळेस अतिक्रमणामुळे एकच गर्दी होऊन या गर्दीत एक भाविक मृत्यू पावलेला आहे तसेच २०२३ च्या यात्रेत दोन भाविक गंभीर जखमी झाली आहे तरीही प्रशासन जागे झालेली नाही तसेच दर रविवारी मंदिरात धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडतात अतिक्रमणामुळे मंदिरातील पावित्र्य धोक्यात आलेले असून देवस्थानला विकास कामासाठी गेल्या वर्षभरापूर्वी निधी ही मंजूर झालेला आहे परंतु अतिक्रमणामुळे तो निधी तसाच पडून वापस जाण्याची ग्रामस्थांना भीती वाटत आहे. यावर पांडुरंग मते, देवस्थानचे मानकरी जयवंत भातलवंडे, पांडुरंग भातलवंडे, सज्जन कोठावळे, तुकाराम भातलवंडे, नारायण ढवळे, अविनाश पांचाळ, ज्ञानदेव खंडागळे आदींच्या सह्या आहेत.

## शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या शासकीय योजनांचा लाभ घ्यावा - माने

धाराशिव दि.३१ (प्रतिनिधी) – पीक विमा योजना, बांधावर फळबाग लागवड, शेततळे आदी योजनांचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र माने यांनी केले उमरगा तालुक्यातील नागराळ येथे कृषी विभाग व महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ महाबीज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या खरीप हंगाम पूर्व शेतकरी कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी महाबीज महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक राजू माने, तुळजापूर येथील कृषी विज्ञान केंद्राच्या विषय तज्ञ अपेक्षा कसबे, तालुका कृषी अधिकारी डी.बी. रितापुरे आदी उपस्थित होते. यावेळी राजू माने यांनी सोयाबीन पिकासाठी जमिनीच्या प्रकारानुसार सोयाबीन बियाणे निवड याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तर अपेक्षा कसबे यांनी सोयाबीन व तूर या खरीप पिकांची पेरणी, किड व रोग व्यवस्थापन याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच सोयाबीन बियाणे उगवण क्षमता तपासणी, बीज प्रक्रियामुळे होणारे फायदे याबाबत सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमांमध्ये बियाणे उगवण क्षमता व बीज प्रक्रिया याबाबत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. तसेच शेतकऱ्यांना बीज प्रक्रियेसाठी बीज प्रक्रिया ड्रम उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे डी बी रितापुरे यांनी सांगितले. तर शेतकऱ्यांनी बियाणे उगवण क्षमता तपासणी करून व बीज प्रक्रिया करून पेरणी करावी असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी सरपंच नागराळ रेखा पाटील, उपसरपंच गोविंद पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मारुती पाटील, मुरली माने, सुरेश पाटील, मनोज निकम, बालाजी निकम, श्रीकांत माने, कृषी सहाय्यक आरेकर, डी व्ही मुळे, मंडळ कृषी अधिकारी





आर जी बनसोडे, कृषी पर्यवेक्षक आर जी पाटील, कृषी सहाय्यक सुनील कांबळे, पांचाळ, आतिफ शेख, सुनील कुलकर्णी, बलभीम पाटील, कृषी निविष्ठा केंद्र विक्रेते असोसिएशनचे प्रतिनिधी बदोले, माणिकवार, रजपुत, माने, बेस्ट ॲग्री लाईफचे राऊत व बीएएसएफ कंपनीचे प्रतिनिधी नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन कृषी क्षेत्र अधिकारी आयेशा पठाण यांनी तर आभार प्राची मोरळे यांनी मानले.

तसेच खालील मान्यवर उपस्थित होते गोविंद पाटील उपसरपंच मारुती पाटील संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती गुलाब गावकरी मुरली माने सुरेश पाटील मनोज निकम बालाजी निकम श्रीकांत माने तसेच कृषी सहाय्यक आरेकर मुळे डी व्ही मंडळ कृषी अधिकारी बनसोडे आर जी कृषी पर्यवेक्षक आर जी पाटील कृषी सहाय्यक कांबळे सुनील पांचाळ आतिफ शेख सुनील कुलकर्णी कृषी सहाय्यक व नागराळ पंचक्रोशीतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

### परमछाया

अश्मयुगीन किंवा त्याहीपेक्षा अतिप्राचीन काळापासून मनुष्य जन्माचं कोडं अघटित, अचंबित करणारं आहे. शेपूट असणाऱ्या पायापासून ते पुढे दोन हातपाय या आमूलाग्र बदलामधला मनुष्य जन्माचा काळ, जीवनमान खडतर तरीही, सुसह्य होतं यात काडीमात्र शंका नाही. एकट्यानं जीवन जगणारा मानव पुढं कळपात राहू लागला. कंदमुळं, फलाहार, शाकाहार आणि मांसाहार भक्षण करताना, ऊन, वारा, पाऊस या नैसर्गिक गोष्टींपासून आपलं रक्षण कसं होईल या दृष्टीनं विचार करू लागला. जंगल वासातल्या त्याच्या धडपडीला पूर्णतः प्राप्त झालं ते पृथ्वी, आप, वायू, जल या शक्तीला आमंत्रित केलं गेलं तेव्हा तारणहार, अतुलनीय, अज्ञात, अचंबित शक्ती आपल्या आसपास असल्याचं त्याला जाणवलं होतं. त्या शक्तीचं प्राबल्य जाणूनचं पुढच्या काळात अदृश्य शक्तीतील ईशाला आपल्या प्रबळ इच्छा पूर्ततेसाठी आवाहन केलं गेलं. या गोष्टी अलौकिक होत्या. तद्वत: निसर्गात अशा चमत्कारिक अद्वितीय शक्ती असल्याचा दावा काही तज्ज्ञ जाणकारांनी या आधी केला होता. हे शाश्वत सत्य आहे की, अदृश्य शक्तीतील परमेश्वर आपण पाहू तसा दिसतो.

पंचतत्त्वातील त्याचं असणं, आपल्या जीवनचक्राला गती देणं यातून सहज लक्षात येतं. मनुष्य जन्माचा इतिहास उलगडताना मनुष्य योनीतला जन्म भाग्यवंतानाच प्राप्त होतो. ही सत्यता पटवताना संतांची वचने मनुष्य धर्माचे, कर्तव्याचे, जन्माचे सार सांगतात. जन्म एकदा मिळतो, त्यायोगे मनुष्य कुळात जन्मलेल्या मानवाचा उत्कर्ष हा त्याच्या समतावादी विचारात दडलेला असतो हे उघडचं आहे. कोणाही जीवाचा न घडावा मत्सर, वर्म सर्वेश्वर पूजनाचे! अशा या समतावादी विचारसरणीत अदृश्य शक्तीमधला परमेश्वर आढळतो. पंचतत्त्वात अदृश्य शक्ती वावरतात. हा भ्रम किंवा आभास नाहीय, तर या शक्ती आपल्या हळव्या, भाऊक मनाशी जोडल्या गेलेल्या असतात. चराचरातील शक्ती मानवी मेंदूपासून शरीरांतर्गत अवयव, मनावरही ताबा मिळवते. त्याच्यापुढं नतमस्तक होतो आपण. जमीन पर्वत मोठे असतात. त्याहून मोठा असतो समुद्र. पण समुद्रातून मोठे असते ते आभाळ. पंचभुतातली आभाळभर माया सर्वत्र आपले पाश रोवते. समुद्राची गाज, अथांगता काजळ तीट लावते. हिरवाईने निसर्ग नटतो. श्वासाला कारणीभूत ठरणारा वारा वेगेवेगे उनाड धावत निसर्ग चक्राला गती देतो. अशा या किमयागार अद्भुत शक्तींचे पांग मानव जन्मोजन्मी फेडू शकणार नाही. निदान त्याच्या प्रती आपले समर्पण हीच त्याला वंदना ठरेल. दुसरी महत्त्वाची वचन पूर्तीतली शक्ती म्हणजे. जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपले, तोचि साधू ओळखावा, देव तेथेची जाणावा! सर्वधर्मपंथ अनुयायातील संत, माहात्म्यांना देव माणसात दिसतो.

माणसामधला देव ओळखता आला पाहिजे. गरजा नसणे वा कमी असणे ही ईश्वरी प्रेरणा मानल्यास, स्वकर्म ही ईश्वरी पूजा असेल असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. प्रामाणिक माणसं ही ईश्वराची सर्वोत्तम कृती आहे, असं देखील म्हणता येईल. मनुष्याच्या गुणदोष, स्वरूपाची वैयक्तिक पातळी वेगळी असली तरी, समजण्याची कला, सामंजस्य, कौशल्य, मौलिक सल्ला, प्रेम, सांत्वन या आणि बऱ्याच गोष्टी माणसातल्या अदृश्य शक्तीचा परमेश्वरी साक्षात्कार घडवतील. अनेक गोष्टीवर प्रेम करताना; चिंतनाने अंतर्मनात दडलेल्या परमेश्वराला जाणलं तर मनुष्य योनीतल्या ईश्वरास जाणून घेतल्याचे सार्थकी लागेल. यासाठी देह, मन, बुद्धी, वेळ या अत्युच्यम देणगीचा सदुपयोग निश्चित बळ देणारा ठरेल.

याप्रसंगी आपल्यातील तत्त्व ओळखून शब्द अर्था आधी यावा, हे तो ईश्वराचे देणे. बा. भ. बोरकरांच्या या पंक्ती बरंच काही शिकवून जातात. तेव्हा सत्यम-शिवम-सुंदरम अशा विचारधारणेने भारलेल्या देवत्वाचे आपण पायिक असू. जाणीवपूर्वक चांगल्या विचारांचं जाळं आपल्या अवतीभोवती विणलं जात असेल, तर अदृश्य शक्तीचा सकारात्मक परिणाम मनावर गडद छाया घेऊन वावरणाऱ्यांना ज्ञानाचा प्रकाश देईल. शेवटी पंचमहाभुतात जन्मलेलो आपण या अवताराचे देदीप्यमान अंश आहोत. आसपासच्या अदृश्य शक्ती चांगल्या माणसाकडून आलेल्या असो वा पंचतत्त्वाकडून वा परमेश्वरी चिंतनातून लाभलेल्या असो, मनन-चिंतनातला आनंद मानवाला सदृश्य अशा महा शक्तिरूपी परमेश्वरापर्यंत नेऊन सोडतो हेच खरंय. ईशप्राप्तीचा मार्ग अंतःकरणापासून निघून अनादी, अनंत साक्षात्कारापर्यंत पोहोचतो.

एकविसाव्या शतकातली आपली वाटचाल म्हणजे, बोले तैसा चाले, त्याची वंदावी पावले म्हणत, सृजनाचा स्वीकार करावयास सादर हीच असावी. खरं तर मानवाला सदैव भौतिक सुखांना तारून धरणाऱ्या ईश्वर कृपा कवचाची गरज भासत आलीय. तेव्हा जोवर मनुष्य या धरतीवर असेल तोवर पुण्यकृपेनं अदृश्य शक्ती, परम ईश्वरीकृपा मानवाची छाया बनून राहतील. दया, क्षमा, शांती तेथे देवाची वस्ती आणि हेच अंतिम सत्य जगाच्या अस्तापर्यंत राहील.

# मतदानाचा टक्का घसरला; कोण जबाबदार?

मुंबईत जे घडतं, त्याची चर्चा देशभर होते. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत देशाच्या कानाकोपऱ्यांतून लोक रोजगारासाठी येतात. ते मुंबईकर होऊन जातात. त्यामुळे मुंबईतल्या घडामोडींचे परिणाम देशभर ऐकायला मिळतात. देशात लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. मुंबईत भाजपाप्रणीत महायुती की काँग्रेसप्रणीत महाविकास आघाडी बाजी मारणार याकडे राजकीय धुरिणांचे लक्ष लागलेले आहे. सन २०१४ आणि सन २०१९ मध्ये भाजपाप्रणीत एनडीएने सहापैकी सहा लोकसभेच्या जागा जिंकल्या होत्या. त्यामुळे यंदा मुंबईचा कल काय आहे यावरून राजकीय वर्तुळात माहोल गरम आहे. महाराष्ट्रातील पाचव्या टप्प्याचे मतदान सोमवारी पार पडले. मुंबईतील सहा मतदारसंघांसह १३ मतदारसंघांत कोण जिंकणार यापेक्षा यंदा मतदानाची टक्केवारी अतिशय निराशाजनक कशी राहिली, यावर चर्चा सुरू झाली आहे. राज्यात १३ लोकसभा मतदारसंघात सरासरी ५४.३३ टक्के मतदान झाले. त्यात दक्षिण मुंबईत कमी मतदान झाल्याचे पाहायला मिळाले. दक्षिण मुंबईत ४७.७० टक्के मतदान झाले. दक्षिण मुंबईत २०१९च्या तुलनेत यावेळी चार टक्के मतदान कमी असल्याचे पाहायला मिळाले.

दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघाचा विचार केला तर या ठिकाणी गुजराती मतदारांची संख्या जास्त आहे. अनेक सोसायट्यांमध्ये राहणारे नागरिक, सदस्य शनिवार, रविवार आणि सोमवार अशा सलग सुट्ट्या आल्याने मतदानाच्या दिवशी मुंबईबाहेर फिरायला गेले असल्याचे दिसून आले. मुंबईत बॉलिवूड स्टार शाहरूख खान, क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांनी मतदान करत, बोटाच्या शाईची खूण दाखवत, मुंबईकरांनाही मतदानासाठी आवाहन केले. संध्याकाळी ६ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडली. त्यावेळी मतदानाचा टक्का वाढला नाही. याबाबत मराठी अभिनेता पुष्कर श्रोत्री यांची सोशल मीडियावरील दिलेली प्रतिक्रिया बोलकी आहे. केंद्र सरकारने मतदान करण्याबाबतचा निर्णय घ्यावा, अर्थात कायदा करावा असे परखड मत पुष्कर श्रोत्री यांनी व्यक्त केले आहे.



लोकसभा निवडणुकीमध्ये देशाच्या पंतप्रधानपदी कोणाला विराजमान करणार यासाठी तुमचे प्रत्येक मत महत्त्वाचे असते. माझ्या देशातील प्रगती कशी असावी, त्यासाठी कोण काम करू शकतो, याचा विचार करणे गरजेचे आहे. त्यामुळे मतदान करणे हे आपले कर्तव्य आहे. विदेशात जर मतदान केले नाही, तर सरकारी सवलती आणि योजनांपासून तुम्ही वंचित राहता. विदेशात मोठ्या प्रमाणावर १००% मतदान होत असते. तशा प्रकारे भारतात निर्णय केला पाहिजे. तसा कायदा केला पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मतदानाच्या दिवशी मौजमजेसाठी कुटुंबासह जाणे हा ट्रेंड वाढत चालला आहे. राष्ट्रीय कर्तव्याची भावना मुंबईकरांनी बाळगायला हवी, हे खरे तर सांगण्याची गरज नाही.

दुसरा मुद्दा निवडणूक आयोगाच्या ढिसाळ नियोजनामुळे हजारो मुंबईकरांना मतदानापासून वंचित राहावे लागले, अशा तक्रारींची सोशल मीडियावर चर्चा आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक मतदानासाठी आले होते. मात्र निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांना मतदानाची प्रक्रिया करण्यासाठी वेळ लागत असल्याचे पाहायला मिळाले. पक्षाच्या विविध कार्यकर्त्यांकडे वेगवेगळे ॅप्स होते. ज्यामध्ये मतदारांची नावे लगेचच मिळत होती. मात्र निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांना लिस्टमध्ये नाव शोधण्याची वेळ आली होती. यातच वेळ वाया जात असल्याचे पाहायला मिळाले. उन्हामुळे प्रचंड त्रास जाणवत होता. नियोजन अतिशय ढिसाळ होते. साधी पाणी पिण्याची व्यवस्था देखील उपलब्ध नव्हती. त्यामुळे नागरिकांना त्रासाला सामोर जावे लागले. अनेकांनी लांबच लांब रांगा पाहून मतदान न करणे पसंत केले.ढिसाळ नियोजनामुळे अनेक मतदान केंद्रांवर संथगतीने मतदान सुरू होते. मतदान केंद्रांवर मतदानाची वेळ संपून गेल्यावरही रांगा होत्या. त्यामुळे मतदारांमध्ये तीव्र नाराजी, संताप आणि गोंधळाचे वातावरण होते. मुंबईतील विलेपार्ले, उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातील बिंबीसारनगर, बोरिवली, दहिसरसह अनेक भागांत मतदानाला विलंब झाल्याची तक्रार मतदारांनी केली. मतदानाला विलंब होत असल्याने काही जण मतदान न करताच निघून गेले. तर काहींनी तासनतास उभे राहून मतदान केले. आयोगाच्या ढिसाळ नियोजनावर मतदारांनी संताप व्यक्त केला. नाशिकमध्ये मतदान केंद्रावर मोबाइल बंदी केल्याने अनेक मतदारांनी नाराजी व्यक्त करीत उपस्थित पोलिसांशी वाद घातला. मात्र पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्यानंतर काहीजण मतदान न करताच माघारी फिरले. यामुळे मतदानाची टक्केवारी कमी झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मतदार केंद्रात मोबाइल नेण्यास मनाई असल्याची माहिती मतदारांपर्यंत पोहोचली नाही.

अनेक मतदार मोबाइल घेऊन मतदान केंद्रावर आले होते. मात्र पोलिसांनी मोबाइल मतदान केंद्रात नेण्यासाठी मज्जाव केल्याने मोबाइल कुठे ठेवावा, असा प्रश्न निर्माण झाल्याने मतदारांनी मोबाइलसाठी मतदान न करता माघारी फिरले, अशा असंख्य मतदारांच्या तक्रारी आहेत.मात्र जे सहपरिवार मतदान करण्यासाठी आले, त्यांनी एकमेकांचे मोबाइल सांभाळून मतदानाचा हक्क बजावला, तर अनेकांनी मोबाइल सायलेंट किंवा बंद करून मतदान केले. एकमेकांचे मोबाइल सांभाळण्यात दोन तास वाया गेल्याची प्रतिक्रिया मतदारांकडून ऐकायला मिळाली.

नाशिकसह मुंबईमध्ये ४० अंश सेल्सिअस तापमान होते. अशाच मतदान केंद्रावर मोठी गर्दी होती. मतदान करण्यासाठी एक तासाहून अधिक वेळ लागत होता. मात्र या ठिकाणी कुठल्याही प्रकारच्या पाण्याची आणि सावलीची व्यवस्था नसल्याने नागरिकांना बराच वेळ उन्हात उभे राहावे लागले. त्यामुळे खूप त्रास झाला. यापुढे निवडणूक आयोगाने मतदारांची गैरसोय होणार नाही याचा भविष्यात यातून बोध घ्यायला हवा.

## स्वप्न

आपल्या जीवनाला अनेक गोष्टी अर्थ आणत असतात. सुंदर, भव्य स्वप्नांचा अंतर्भाव त्यात असतो. स्वत:ला फुलविण्याची आस म्हणजे आनंददायी स्वप्नांचा ध्यास. स्वप्नील चांदण्यांनी जीवनास अर्थ आला. एक धागा सुखाचा दोघात बांधलेला, असं उगाच नाही म्हणत. आयुष्यातल्या कुठल्याही वळणावर सोबत करतात ही स्वप्न. म्हणायला आपण एकटे वा दुकटे असलो तरी, स्वप्नांचा हिंदोळा घेऊनच फिरतो. खर तरं स्वप्न पाहणं वाईट नाही. तत्ववेत्त्या सुधा मूर्ती यांचे विचार काहीसे असेच. त्यांच्या मते स्वप्न पाहणं चांगलं, पण त्यांना प्रत्यक्षात उतरवणं जास्त चांगलं. असे निर्लेप विचार जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन दाखवतात. स्वप्नातल्या कळ्यांनो उमलू नकाचं केव्हा, गोडी अपूर्णतेची लावील वेड जीवा! इथं नायिका स्वत:च्या स्वप्नांविषयी नकारात्मकता दर्शवित असली तरी, ती स्वप्नं पूर्ण होवोतं अशी तिची इच्छा झाली नाही तर नवल ते काय? बालपणापासून ते मोठे होईपर्यंत आपल्या स्वप्नांच्या वाटा, त्याची परिपूर्तता वेगळी असली तरी, ती बघणं आपण सोडत नाही. मग ती दिवास्वप्नं असो वा रात्रस्वप्न. त्या जोडीला शिक्षण, उद्योग न करता पोकळ बातांनी ती रंगवणं, म्हणजे वेळ आणि शक्तीचा अपव्ययचं म्हणायला हवा.



हे ज्याला ज्याला कळतं, तो जागतो कर्तव्याला. निशाण फडकवतो कर्तृत्वाचे. नित्य कामाच्या दबडग्यात भागीदार करतो स्वप्नांना. ध्येय उराशी घेऊन जगणारी माणसं ही अशी असतात. स्वप्नं आपली मानसिकता दर्शवतात. जे आपण नेहमी जगतो त्याचा भाग होऊन जगतात किंवा जे जगलेलोचं नाहीत ते जगण्यासाठीचा मार्ग दाखवतात. गंमत असते बघा अशा बहुरूपी स्वप्नांची.अलवार मनाच्या सांदीकोपऱ्यात निगुतीनं विसावणारी, हितगुज करणारी स्वप्न. दृष्टिपटलावर आभासी जग निर्माण करणारी ही स्वप्नचं. कोणी वाली नसतो त्यांना आपल्या खेरीज. चांगल्या-वाईटाचा पाचोळा घेऊन फिरणारी. यांची एन्ट्री एक्झिट आपल्यावरचं असते. आपणचं आस लावतो नव किरणांची. मग काय!! रोजचा दिवस केशरिया रंगी होऊन उजाडतो. निशा खुणावू लागते. कोणाला मर्सिडीज हवी असते, तर कोणाला देखणी प्रेयसी, कोण टॉपर होण्याची शिडी चढतो; तर कोणी करोडपती होऊ पाहतो. तालावर नाचवतात ही स्वप्नं. यात आपला पार मृदंग होतो. मग अशा या ताटव्यात सगळेचं बहकतात.स्वप्नील दुनिया रंगभरी, मनाला देई उभारी. अशा अवस्थेपर्यंत आपण पोहोचतो देखील. अंतर्मनातल्या एका अत्तर कुपीनं सुगंधित करावा आसमंत आणि दरवळावा तिचा गंध. पूर्णत्वाला नेणारी स्वप्नं उभारी देतात मनाला आणि जगणं सुसह्य करतात; परंतु अप्रत्यक्षपणे निचरा न झालेल्या स्वप्नांचं काय? रात्र फारकत घेते या जगताशी. ही करारी स्वप्नं छळतात मानवाला. त्यातून येणारा हुंकार दर्दभरा होतो.

ही दाहकता कवयित्री आपल्या काव्यात रुजवते ती अशी,

कातरवेळी रात्र बिलगते, चंद्र-चांदण दुधात न्हाते.
आडोशाला उभे राहुनी,
स्वप्न उशाशी रोज सांडते ।
स्वप्नामधले वळण नेमके,
पाहण्याचे मी रोज टाळते. सुखाचेही क्षण झेलण्या, दु:खाशी मी
रोज भांडते. आडोशाला उभे राहुनी, स्वप्न उशाशी रोज सांडते ।
हे सांडलेपण ज्याचं त्याला
कळतं. स्वप्नांची स्वप्नांशीचं
गाठभेट, निशेलाही उमगली
नव्हती. सोसण्या पलीकडे देहाला, काळोखी रात्र बिलगली
होती ।
करारात बंधिस्त होते स्वप्न,
विभागून घेतला होता जीव
चांदणं वाटेवरी, भीषण स्वप्नांनी केले निर्जीव!

ही निर्जीवता ग्रहण लावू शकते. तेव्हा या निसरड्या वाटेवर सांभाळून चढलेलं बरं. इथंतर प्रत्येक श्वासाबरोबर, धावणाऱ्या सामर्थ्याशी आणि प्रेरणा देणाऱ्या स्वप्नांशी गाठ बांधिल आहे. तुमचं स्वप्नं किती मोठं यावर पुढे जाऊन तुम्ही किती मोठे व्हाल हे ठरतं. मात्र स्वत:चे मनोरे रचताना, दुसऱ्याच्या स्वप्नांना पायदळी न तुडवण्याइतपत भान असायला हवं. स्वप्नावर जगणारी माणसं, नव्या दमानं उभी राहतात. लढा देतात वास्तवाशी. लाथ मारेन तिथं पाणी काढेनं! या अर्थानं स्वप्नांनी झपाटून जाणं आणि त्याच्या पूर्ततेसाठी झटून प्रयत्न करणं, या प्रकारच्या जगण्यात जो स्वत:ला झोकून देतो, त्याचं आयुष्यभराचं सोनं होतं.**-मोरपीस: पूजा काळे**

## भीतीला करा बाय बाय, ५ पद्धतीने वाढवा आत्मविश्वास



मुंबई: आत्मविश्वास आपल्या जीवनातील महत्त्वाचा पैलू आहे जो यशाचे दार खोलतो. यामुळे आपल्या क्षमतांवर विश्वास ठेवण्याचे आणि आपले लक्ष्य गाठण्यास सहाय्य करतो. दरम्यान, काही लोकांमध्ये आत्मविश्वासाची कमतरता असते. ते भीती आणि शंकेने ग्रस्त असतात. तुम्हीही त्यापैकी एक आहात तर खाली दिलेल्या पद्धतीने तुम्ही तुमची भीती दूर करू शकता.

नकारात्मक विचारांनी राहा दूर

आपण अनेकदा नकारात्मक विचारांनी घेरलेलो असतो ज्यामुळे आत्मविश्वास कमी होतो. आपल्या मनात नकारात्मक विचारांना थारा देऊ नका. हे विचार केवळ आपली भीती आणि चिंता वाढवतात. सकारात्मक विचार ठेवा.

आपल्या क्षमतांवर विश्वास ठेवा.

आपल्या यशस्वी गोष्टींना आठवा

आपण आपल्या आयुष्यात ज्या गोष्टी यशस्वीपणे केल्या आहेत त्या आठवा. यामुळे तुम्हाला प्रेरणा मिळेल. कठीण परिस्थितीशी सामना करण्याचे बळ मिळेल. यामुळे तुम्हाला तुमच्यातील ताकद संपेल.

लहान लक्ष्य प्राप्त करण्याचा प्रयत्न करा

मोठे लक्ष्य निर्धारित करण्याऐवजी लहान लहान लक्ष्य प्राप्त करा. लहान लहान लक्ष्य प्राप्त करण्याने आत्मविश्वास वाढण्यास मदत होते.


स्वत:ची काळजी घ्या

आपली काळजी स्वत: घ्या. यासाठी चांगले जेवण घ्या. भरपूर पाणी प्या. पुरेशी झोप घ्या आणि नियमितपणे व्यायाम करा. जेव्हा तुम्हाला स्वत:बद्दल चांगले वाटत असेल तेव्हा आत्मविश्वास भरलेला असतो.

दुसऱ्यांची मदत घ्या

जर तुम्हाला आत्मविश्वासाची कमतरता जाणवत असेल तर आपले मित्र अथवा कुटुंबाची मदत घ्या. त्यासाठी संकोच करू नका.

## राशी भविष्य



१ जून २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग :लाल,शुभ दिशा:पूर्व
पथ्यपाणी असलेल्यांनी जास्तीचे गोड खाणे टाळा. महिलांनी स्वयंपाक घरातील वावर काळजीपूर्वक करावा.

वृषभ : शुभ रंग:लाल, शुभ दिशा :पूर्व
काहीजणांना परगावी जाण्याचे, सहलीचे तर काहीजणांना परदेश दौऱ्याचे वेध लागतील.

मिथुन : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम
जुने मित्र परिवार यांच्याबरोबर मजेत वेळ जाईल, जुन्या आठवणींना उजाळा मिळेल.

कर्क : शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पश्चिम
महिलांचा वेळ देवधर्म, पूजाअर्चा यात चांगला जाईल. त्यातून समाधान मिळेल.

सिंह : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पूर्व
गोड-धोड खाण्याचे प्रसंग येतील. आपल्या जुन्या रुढी-परंपरा जपण्यासाठी काही कार्यक्रमांचे आयोजन कराल.

कन्या : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व
महिलांचा बिघडलेला खाद्यपदार्थ थट्टेचा विषय होईल. युवकांनी व्यसनापासून दूर रहा.

तुळ : शुभ रंग:लाल, शुभ दिशा:दक्षिण
नाराज झालेली मित्रमंडळी, सगेसोयरे, सहकारी हे संक्रातीच्या निमित्ताने पुन्हा एकत्र येतील.

वृश्चिक : शुभ रंग:लाल,शुभ दिशा: दक्षिण
प्रिय व्यक्तींच्या गाठीभेटी होतील. नातेसंबंध दृढ होतील, वैवाहिक जोडीदाराची साथ चांगली मिळेल.

धनु : शुभ रंग :लाल, शुभ दिशा :पश्चिम
मुलांचे नेत्रदीपक यश व आर्थिक आघाडीच्या आश्वासक हालचाली या आपल्या जमेच्या बाजू राहतील.

मकर : शुभ रंग:लाल, शुभ दिशा: पश्चिम
गोड बोलण्यांने होणारे फायदे लक्षात येतील. वृद्धांनी आपले पथ्यपाणी सांभाळणे हितकारक ठरेल.

कुंभ : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व
आपल्या पराक्रमामुळे समाजात व कुटुंबात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. मितभाषी राहील्याने आर्थिक फायदा होईल. व्यापारात नवीन प्रस्ताव मिळतील. प्रिय व्यक्तिची भेट होण्याचे योग आहेत.

मीन : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम
गोड-धोड जेवणावर योग्य नियंत्रण आणा. संततीकडे आपले दुर्लक्ष होत नाही ना याकडे लक्ष द्या.

०१ जूनला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर सुर्य व बुधाचा प्रभाव आहे. भावनेपेक्षा तुम्ही बुध्दीला अधिक महत्व देता. तुमची तल्लख बुध्दी अनेक विषयात स्वैर संचार करू शकते. उत्साहाने तुम्ही सतत भारलेले असता. तुमचा सहवास इतरांनाही स्फूर्तिप्रद वाटतो. तुमचे विचार स्पष्ट असतात व भाषाप्रभुत्वामुळे ते इतरापर्यंत पोचवणे तुम्हाला जमते. नेतृत्वाचे गुण तुमच्या अंगी जन्मजात असतात. कुणाच्या हाताखाली काम करायला तुम्हाला आवडत नाही. भ्रष्टाचाराविरूध्द तुम्ही उभे राहता. आदर्श प्रस्थापित करण्यासाठी सतत झटता.

अस्मिता व अहंकार यातल्या सीमारेषा ओळखा. बुध्दी इतकेच जीवनात भावभावनांनाही महत्व आहे. तर्ककर्कश विचारसरणी टाळून इतरांच्या भावनांशी समरस व्हायला शिका. अति बौध्दिक श्रमांचा ताण मेंदूवर, मज्जासंस्थेवर पडणार नाही याची काळजी घ्या. बैठी जीवनशैली टाळा.

कार्यक्षेत्र : व्यवस्थापन कौशल्य ही तुमची जमेची बाजू आहे. प्रशासनपध्दत जास्तीत जास्त कार्यक्षम कशी बनवता येईल याकडे तुमचे लक्ष्य असल्याने व्यवस्थापकीय सल्लागार म्हणूनही तुम्ही उत्तम काम करा. शासकीय, निमशासकीय क्षेत्रात, महापालिकात तुम्हाला चटकन प्रवेश मिळेल. त्यासाठी लोकसेवा आयोग वा इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करा. छायाचित्रण, नाट्य, चित्रपट दूरदर्शन दिग्दर्शक वा लेखक म्हणून यश व नावलौकिक सहजगत्या मिळू शकेल.

प्रणयी जीवन : आपला जिवलग आपल्यासारखाच दिलदार, उदार अंत:करणाचा असावा अशी तुमची अपेक्षा असते. स्वार्थी, संकुचित वृत्तीची माणसे तुम्हाला आवडत नाहीत. आपल्या पराक्रमाचे योग्य कौतुक करून उत्तेजन देईल अशा जोडीदाराच्या तुम्ही शोधात असता. अशा व्यक्तिमत्वाचा साथी तुम्हाला २१ मार्च ते २० एप्रिल दरम्यान जन्मलेल्या व्यक्तीत सापडेल.

वर्षफळ : कार्यालयात परिश्रमाला पर्याय नाही. प्रगती मंदगतीने पण स्थायी स्वरूपाची होईल. जानेवारी फेब्रुवारी मध्ये उत्साह उमेद वाढेल. नवी आव्हाने पेलाल. मार्च एप्रिल मध्ये कार्यालयीन कामानिमित्त प्रवास दौरे होतील. मे जून मध्ये जीवनाला मना प्रमाणे आकार देण्याचे स्वप्न साकार होईल. जुलै ऑगस्ट मध्ये प्रणयी जीवनात कुणाचा तरी प्रवेश होईल. प्रीती फुलेल. ऑक्टोबर नोव्हेंबर मध्ये प्रशिक्षणाची संधी आल्यास लाभ घ्या.

महत्वाचे वर्ष : १, १०, १९, २८, ३७, ४६, ५५, ६४, ७३.

भाग्यरत्न : माणिक

याच तारेखेची व्यक्ती : मरिलिन मन्रो, रशीद पटेल

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती प्रयागअक्का कराड समर्पित जीवनगौरव पुरस्काराचे ३ जून रोजी रामेश्वर येथे वितरण

लातूर दि.३१ :- विश्र्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणेतर्फे पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का कराड यांच्या अकाराव्या पुण्यस्मरण/स्मृतिदिनाचे औचित्य साधून, ज्ञान-विज्ञान आणि अध्यात्माच्या समन्वयातून आयुष्यभर समाजप्रबोधन व सांप्रदायिक सद्भावनेचे सेवाभावी कार्य समर्पित व निरपेक्ष भावनेने अव्याहतपणे करून, समाजासमोर आदर्श निर्माण करणार्या थोर तपस्विनी कुलीन पंचकन्यांना ङ्गपूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का कराड समर्पित जीवनगौरव पुरस्कारफ देऊन त्यांचा सन्मान ३ जून २०२४ सोमवार रोजी मानवतातीर्थ म्हणून ओळखल्या जाणार्या लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर येथे होणार असून या निमित्ताने संत गोपाळबुवा महाराज मंदिराचे पुर्ननिर्माण उद्घाटन आणि शिवलिंगाची प्राणप्रतिष्ठापणा व कलशारोहन सोहळा आयोजित करण्यात आला आहे अशी माहिती माईर्स एमआयटीचे अध्यक्ष प्रा.डॉ. मंगेश तु. कराड आणि विश्वस्त व महासचिव प्रा. स्वाती कराड-चाटे यांनी दिली.

विश्र्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे यांच्यावतीने पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का कराड समर्पित जीवनगौराव पुरस्कार पुण्यातील थोर समाजसेविका श्रीमती मेधा सुरेश घैसास, अयोध्या येथील श्री रामायणम धाम आश्रमाच्या माध्यमातून समाजप्रबोधन व ज्ञान विज्ञान अध्यात्माचा प्रसार करणार्या विदूषी दीदी मॉ. मंदाकिनी श्रीराम किंकर, ज्येष्ठ प्रवचनकार व कीर्तनकार ह.भ.प.सौ. भगवतीताई सातारकर-दांडेकर, थोर समाजसेविका श्रीमती मीरा महार्जन आणि थोर निष्ठावंत वारकरी व कवयित्री श्रीमती विजयाबाई गोविंद कदम या पंचकन्यांना देण्यात येणार असून सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, स्मृतिपदक व रोख रु. २१,०००/- रुपये असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का कराड या भारतीय संस्कृती, परंपरा आणि तत्त्वज्ञानाचे मूर्तिमंत प्रतीक, तत्त्वज्ञ संत श्री ज्ञानेश्र्वर माऊली, जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज आणि समचरण पांडुरंगाच्या सेवेत अत्यंत श्रद्धा, निष्ठा व भक्तिमय असे व्रतस्थ आणि समर्पित जीवन जगल्या. त्यांच्या कार्यापासून सर्वांनी प्रेरणा घ्यावी, हा या पुरस्कार देण्यामागचा हेतू आहे.

या समारंभासाठी जगप्रसिद्ध संगणक तज्ञ डॉ. विजय भटकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्र्वनाथ दा. कराड यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून याप्रसंगी माईर्स एमआयटीचे कार्याध्यक्ष राहुल विश्र्वनाथ कराड हे उपस्थित राहणार आहेत.

प्राणप्रतिष्ठापना सोहळा व मंदिराचे उद्घाटन

संपूर्ण भारतात मानवतीर्थ म्हणून ओळखल्या जाणार्या लातूर येथील रामेश्र्वर (रूई) येथील श्री संत गोपळबुवा महाराज मंदिराचे पुनर्निमाण करण्यात आले असून, भगवान महादेवाच्या शिवलिंगाची प्राणप्रतिष्ठापना कलशारोहण सोहळा व पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का कराड समाधी मंदिराचा उद्घाटन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. प्राणप्रतिष्ठापना व मंदिराचा उद्घाटन सोहळा महाराष्ट्रातील प्रसिद्ध पुरोहित मिलिंद राहुरकर गुरूजी यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. ह.भ.प.हरिहर महाराज दिवेगांवकर यांच्या शुभ हस्ते कलशारोहण सोहळा होणार आहे. या प्रसंगी आर्यव्रत कराड, विरेन कराड आणि श्रीराम नागरे हे उपस्थित राहणार आहेत.

जीवनगौरव पुरस्कार मानकरी यांचा अल्प परिचय

श्रीमती मेधा सुरेश घैसासः- संपूर्ण जीवनभर त्याग आणि समर्पणाच्या भावनेतून आणि ङ्गमानव सेवा हीच ईश्र्वर सेवाफ हे परमध्येय ठेऊन, अत्यंत श्रद्धेने व निष्ठेने त्यांनी आपले जीवन समाजसेवेसाठी अर्पण केले आहे. त्या पुण्यातील प्रतिथयश सर्जन वै. डॉ. सुरेश गोविंद घैसास यांच्या सुविद्य पत्नी आहेत. समाजातील तळागाळातील लोक तसेच कष्टकरी, शेतकरी व कामगार यांच्यासाठी मोफत वैद्यकीय सेवा पुरवितात. त्या आजही जनतेची अव्याहतपणे सेवा करीत आहेत.

दीदी मॉ. मंदाकिनी श्रीराम किंकरः- अत्यंत समर्पित भावनेने, श्रद्धेने, निष्ठेने व खर्या अर्थाने भारतीय संस्कृती, परंपरा व तत्त्वज्ञानानुसार दीदी मॉ. मंदाकिनी श्रीराम किंकर अतिशय व्रतस्थ जीवन जगत आहेत. त्या थोर साधक व तपस्विनी पद्मभूषण पं. राम किंकर यांच्या कन्या व श्री रामायणम धाम आश्रम, अयोध्याच्या माध्यमातून समाजप्रबोधन व ज्ञान विज्ञान अध्यात्माचा प्रसार करणार्या विदूषी आहेत.

ह.भ.प.सौ. भगवतीताई सातारकर-दांडेकरः- नादब्रह्मऋषी ह.भ.प.वै. बाबा महाराज सातारकर यांच्या त्या कन्या आहेत. आपल्या सुश्राव्य व सुमधुर कीर्तनाच्या माध्यमातून माऊलींची ज्ञानेश्र्वरी व हरिपाठ, जगद्गुरूंची गाथा, नाथांचे भारूड व भागवत या ग्रंथांचे आयुष्यभर चिंतन, मनन व त्यानुसार आचरण त्यांनी केले आहे. अत्यंत मधुर स्वरामध्ये त्या प्रवचन व कीर्तन अतिशय तन्मयतेने त्या सादर करतात. गेली अनेक वर्षे त्या आषाढी व कार्तिकी वारी नित्यनियमाने करीत आहेत.

श्रीमती मीरा महार्जनः- ङ्गमानव सेवा हीच ईश्र्वर सेवाफ हे जीवनाचे परमध्येय ठेवले आहे. त्यासाठी त्या अहोरात्र कार्य करीत आहेत. पीडित, दुखी व्यक्तींच्या चेहर्यावर हास्य आणण्यासाठी त्या जीवाचे रान करतात. त्याचेच उदाहरण म्हणजे २०१५ या वर्षी नेपाळ येथे भूकंप आला होता. तेव्हा पीडितांच्या सहाय्यासाठी त्यांनी अहोरात्र कष्ट करून त्या नागरिकांना साहरा दिला.

श्रीमती विजयाबाई गोविंद कदमः- मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धिचे कारण ।। जे जे भेटे भूत । तयासि मानिजे भगवंत ।। या उक्तीचे मूर्तिमंत प्रतीक असेच जीवन त्या जगत आहेत. तत्वज्ञ संत श्री ज्ञानेश्वर माऊली, जगदगुरू तुकाराम महाराज व पंढरीचा पांडुरंग यांच्यावर त्यांची नितांत श्रध्दा व अपार भक्ती हा त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव आहे. त्या निष्ठावंत वारकरी आहेत. त्यांनी आध्यात्मिक, सामाजिक सारख्या कित्येक ज्वलंत विषयांवर कविताही रचल्या आहेत.

# दूधाचे महत्त्व आणि आरोग्यदायी फायदे: सर्वांगीण विकासासाठी आवश्यक पोषण

दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर दूधाला आपल्या आहारात एक महत्त्वाचे स्थान आहे. दूधामध्ये विविध पोषक घटक आढळतात ज्यामुळे ते आरोग्यासाठी अत्यंत लाभदायक असते. यामध्ये प्रथिने, कॅल्शियम, व्हिटॅमिन डी, बी१२, रिबोफ्लेविन (बी२), फॉस्फरस, आणि इतर अनेक खनिजे आणि जीवनसत्त्वे आढळतात. मुलांच्या शारीरिक आणि मानसिक विकासासाठी दूध अत्यंत महत्त्वाचे आहे. दूधामध्ये असलेले कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी हाडे मजबूत करण्यास मदत करतात, जे मुलांच्या वाढीसाठी अत्यावश्यक आहे. याशिवाय, दूधामध्ये असलेले प्रथिने स्नायूंच्या वाढीसाठी आणि विकासासाठी आवश्यक असतात. मुलांना नियमितपणे दूध दिल्यामुळे त्यांच्या रोगप्रतिकारक शक्तीमध्ये वाढ होते आणि ते विविध आजारांपासून सुरक्षित राहतात. दूध पिण्यामुळे मुलांची ऊर्जा पातळी वाढते आणि त्यांच्या शैक्षणिक आणि शारीरिक कार्यक्षमता सुधारते. प्रौढांसाठी सुद्धा दूध अनेक आरोग्यदायी फायदे प्रदान करते. दूधामध्ये असलेले कॅल्शियम आणि फॉस्फरस हाडे मजबूत ठेवण्यास मदत करतात आणि ऑस्टियोपोरोसिससारख्या हाडांच्या आजारांचा धोका कमी करतात. तसेच, दूधामध्ये असलेले व्हिटॅमिन बी१२ आणि रिबोफ्लेविन (बी२) ऊर्जा पातळी वाढवतात आणि तणाव कमी करण्यास मदत करतात. नियमित दूध सेवनामुळे हृदयाच्या आरोग्यासाठी आवश्यक असलेले फॅट्स आणि प्रथिने मिळतात, ज्यामुळे हृदयाचे कार्य सुरळीत होते. प्रौढांसाठी दूध एक पौष्टिक पेय आहे, जे त्यांच्या एकूण आरोग्यासाठी आणि फिटनेससाठी आवश्यक आहे.

दूधाचे फायदे:

१. दूध कॅल्शियमचा उत्तम स्रोत आहे. कॅल्शियम हाडांचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि हाडे मजबूत ठेवण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. नियमित दूध पिण्यामुळे हाडे ठिसूळ होण्याचा धोका कमी होतो आणि ऑस्टियोपोरोसिससारख्या हाडांच्या आजारांपासून संरक्षण मिळते. विशेषतः लहान मुलांच्या आणि वृद्धांच्या आहारात दूधाचा समावेश करणे अत्यंत आवश्यक आहे.

२. दूधामध्ये प्रथिने मोठ्या प्रमाणात असतात. प्रथिने स्नायूंच्या वाढीसाठी आणि पुनर्बांधणीसाठी आवश्यक असतात. नियमित व्यायाम करणाऱ्या व्यक्तींनी दूध किंवा दूधाचे उपपदार्थ आहारात समाविष्ट करणे अत्यंत लाभदायक ठरते. प्रथिनांमुळे शरीराच्या ऊर्जेची पातळी वाढते आणि व्यायामानंतरच्या थकव्यापासून आराम मिळतो.

३. दूधामध्ये असलेले व्हिटॅमिन आणि खनिजे त्वचेसाठी अत्यंत लाभदायक असतात. दूधामध्ये व्हिटॅमिन ए, बी२ आणि बी१२ असते, जे त्वचेच्या आरोग्यासाठी आवश्यक असतात. दूधाच्या नियमित सेवनाने त्वचा तजेलदार आणि चमकदार राहते. दूधाचे उपपदार्थ, जसे की दही किंवा मस्क, यांचा उपयोग त्वचेसाठी बाहेरून लावण्यासाठीही केला जातो.

४. दूध हे एक ऊर्जावर्धक आहार आहे. यामध्ये कार्बोहायड्रेट, प्रथिने आणि फॅट्स आढळतात, जे शरीराला ऊर्जा प्रदान करतात. दुधामध्ये असलेले लैक्टोज शरीराच्या ऊर्जेची गरज पूर्ण करते. त्यामुळे दिवसभर ऊर्जावान राहण्यासाठी दूध सेवन करणे अत्यंत फायद्याचे आहे.

५. दूधामध्ये असलेले विविध पोषक घटक रोगप्रतिकारक शक्ती सुधारतात. व्हिटॅमिन डी आणि बी१२ ह्या जीवनसत्त्वांमुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि अनेक प्रकारच्या संसर्गजन्य आजारांपासून संरक्षण मिळते.

आज जागतिक दूध दिवसा निमित्य दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालयतर्फे आपणासर्वांना आवाहण करण्यात येते की दूध हे आपल्या आहारातील एक अमूल्य घटक आहे आणि त्याचे सेवन केल्याने आपल्याला अनेक आरोग्यदायी फायदे मिळतात. त्यामुळे, प्रत्येकाने आपल्या दैनंदिन आहारात दूधाचा समावेश करावा आणि त्याचे आरोग्यासाठी असणारे फायदे अनुभवावेत

**-डॉ श्रीकांत कल्याणकर आणि डॉ माधव पाटील**

## पान १ वरून

### देशात येणार....

असं भारताचे नियोजन आहे. सोने-चांदीच्या दरात सातत्याने वाढ आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्या चांदीच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून ही वाढ सुरुच आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना सोन्याची खरेदी करणं परवड नाही. त्यामुळे मोठ मोठ्या बँका, संस्था, सोन्याची मोठ्या प्रमाणात खरेदी करत आहेत. कारण सोन्यातील गुंतवणुक ही मोठ्या फायद्याची समजली जाते. कारण या गुंतवणुकीतून मोठा परतावा मिळत आहे. कारण सोन्याच्याकिंमतीत दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे अनेक बँकांचा आणि संस्थांचा सोन्यामध्ये गुंतवणूक करण्यात कल वाढत आहे.

### महागाई रोखण्यासाठी...

प्रतिक्विंटलवर पोहोचला आहे, जो वर्षभरापूर्वी याच वेळी २,२७७ रुपये होता. खुल्या बाजारात गव्हाचीकिंमत २,२७५ रुपये निश्र्चित केलेल्या किमान आधारभूतकिंमतीपेक्षा जास्त आहे. त्यामुळे सरकार खरेदीच्या लक्ष्यापासून खूप दूर आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, गव्हाची किरकोळ किंमत ३०.७१ रुपये प्रति किलो आहे, जी एका वर्षापूर्वी २९.१२ रुपये होती, तर पिठाची किंमत ३५.९३ रुपये प्रति किलो आहे, जी गेल्या वर्षी ३४.३८ रुपये होती. अशा परिस्थितीत गव्हाची वाढती महागाई रोखण्यासाठी केंद्र सरकार गव्हाच्या आयातीबाबत मोठा निर्णय घेऊ शकते. नवीन सरकारने पदभार स्वीकारल्यानंतर लगेचच शून्य सीमाशुल्कावर गव्हाच्या आयातीला परवानगी देण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

गव्हाची आयात होणार?

देशात ४ जून रोजी लोकसभा निवडणुकीचे निकाल लागणार आहेत. त्यानंकर नवीन सरकार स्थापन होईल. नवीन सरकार याबबातच निर्णय घेईल. सध्या देशातील गव्हाच्या किमती नवीन उच्चांकावर पोहोचल्या आहेत. सध्या सरकारने गव्हाच्या आयातीवर ४४ टक्के सीमाशुल्क लावले आहे. कोची, थुथुकुडी आणि कृष्णपट्टणम या दक्षिण भारतीय बंदरांमधूनच गहू आयात करण्याची परवानगी आहे. आता तब्बल सहा वर्षांनंतर गहू आयात होण्याची शक्यता आहे.

जागतिक स्तरावर गव्हाचे सर्वोच्च पातळीवर

जागतिक स्तरावर गव्हाचे भाव १० महिन्यांतील सर्वोच्च पातळीवर असल्याचे सांगण्यात येत आहे. अन्नधान्याच्या किंमती नियंत्रणात आणायच्या असतील तर भारताला गहू आयात करावा लागेल, कारण ऑक्टोबरच्या आसपास मागणी-पुरवठा संतुलन बिघडू शकते असे काही तज्ज्ञांचे मत आहे. जागतिक बाजारपेठेत गव्हाच्या किंमती १० महिन्यांच्या उच्चांकाच्या जवळ आहेत.

# राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य म्हणजे मराठ्यांच्या इतिहासातील सोनेरी पान:डॉ. बब्रुवान मोरे

अहमदपूर दि. ३१(कारामुंगीकर)- छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर करण्याचे कार्य लोककल्याणकारी महाराणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केले, त्यांचे कार्य म्हणजे मराठ्यांच्या इतिहासातील सोनेरी पान आहे असे स्पष्ट प्रतिपादन महात्मा फुले महाविद्यालय इतिहास विभागप्रमुख डॉ.बब्रुराव मोरे यांनी केले.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, अहमदपूर येथील महात्मा फुले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक विभाग तसेच पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पुण्यश्र्लोक आहिल्यादेवी होळकर जयंती कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मराठी साहित्याचे ज्येष्ठ समीक्षक, शिक्षण तज्ज्ञ तथा प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील हे होते तर डॉ. बब्रुवान मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्र्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

पुढे बोलतांना डॉ. मोरे म्हणाले की, अहिल्यादेवी होळकर यांनी लोककल्याणकारी राज्य करून मराठा साम्राज्याची पताका अखंड भारतामध्ये फडकविण्याचे कार्य केले. त्याचबरोबर मुघलाच्या काळात हिंदू धर्मावर आलेल्या धार्मिक सुलतानी संकट दूर करण्याचे कार्य अत्यंत मुत्सुदी पद्धतीने करतांना त्यांनी भारतातील नष्ट करण्यात आलेले शेकडो मंदिरांचा जीर्णोद्धार कश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंत अटक पासून कटक पर्यंत केला. तसेच जल व्यवस्थापन करून प्रजेला सुखी करण्याचे कार्य अहिल्यादेवी होळकर यांनी करून दाखविले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपाप्रसंगी प्राचार्य डॉ . वसंत बिरादार पाटील यांनी अहिल्यादेवी यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकतांना म्हणाले की, ज्या काळात स्त्रियांना घराबाहेर पडण्याचा अधिकार नव्हता, शिक्षणाचा अधिकार नव्हता अशा काळात अहिल्यादेवी होळकरांनी तब्बल २८ वर्षे यशस्वीपणे राज्यकारभार चालवला. तसेच स्त्रियांची सैन्यफौज निर्माण केली. विविध क्षेत्रांमध्ये पुरुषांबरोबर स्त्रियांना कार्य करण्याची संधी उपलब्ध करून दिली. तसेच त्या भारतातील पहिल्या स्त्री आहेत ज्यांनी वैदिक सनातनपद्धतीचा विरोध करून पतीचे निधन झाल्यानंतर सासरे मल्हाराव होळकर यांच्या आदेशानुसार सती जाणे टाळले. खऱ्या अर्थाने सतीप्रथा बंद करण्याची कार्य अहिल्यादेवी होळकरांनी केले, असे ही ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक भूगोल विभाग प्रमुख डॉ. डी. एन. माने यांनी केले तर आभार क्रीडा संचालक प्रो. डॉ. अभिजीत मोरे यांनी मानले. यावेळी ग्रंथपाल प्रा. परमेश्र्वर इंगळे, डॉ. संतोष पाटील , प्रशांत डोंगळीकर यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# मी शिकलेल्या येरोळ जिल्हा परिषद प्रशालेच्या सुखद आठवणी

शाळा म्हटलं की, सगळ्या जुन्या आठवणींना एकदम उजाळा येतो व त्या एका चित्राप्रमाणे डोळ्यांसमोर उभ्या राहतात. आज शालेय शिक्षण पूर्ण होऊन जवळ जवळ ३५ ते ४० वर्षाचा कालावधी उलटून गेल्या असल्या तरी देखील आठवणी मात्र अगदी ताज्या वाटतात.

आज माझी येरोळ येथील जिल्हा परिषद प्रशाला म्हणजे सध्याच्या शिरूरअनंतपाळ तालूक्यात पुर्वीच्या निलंगा तालूक्यातील नामवंत गुणवंत शाळा होती . या शाळेत शिकलेले विद्यार्थी वरिष्ट पोलीस अधिकारी , न्यायाधिस , शिक्षणअधिकारी , अन्न भेसळ अधिकारी , प्राद्यापक , आदर्श शिक्षक , प्रगतशिल शेतकरी , राजकिय नेते , मोठे उद्योजक , वकिल , अभियंते , आडत व्यापारी , पत्रकार व इतर क्षेत्रात मोठे नाव कमवित आहे . आज या शाळेची इमारत आहे. पण मी या शाळेत असताना ती बैठीच, अगदी घराप्रमाणे होती.

चारी बाजूंनी वर्ग होते व मध्ये भले मोठे प्रशस्त मैदान होते की त्या प्रशस्त मैदानात जेव्हा खेळाचे सामने व्हायचे तेव्हा दोन कब्बडीचे, दोन लंगडीचे, एक खो-खोचा सामना, उंच उडी, गोळा फेक असे सामने व्हायचे. इतके मोठे मैदान असलेली येरोळ येथील माझी जिल्हा परिषद प्रशाला हायस्कुल ही एकमेव शाळा आहे. त्यात त्या मैदानाच्या तीन बाजूंना वर्ग व मोठी झाडे आहेत. त्यामुळे आम्हाला रोज निरनिराळे पक्षीही




पाहायला मिळायचे व शाळेच्या पाटीमागे चौसष्टे काकाचा अंगुराचा बाग होता , त्यावेळी अंगुर ही खायला मिळायचे. एकदम गावच्या शाळेसारखी माझी शाळा होती. मैदानात दररोज शाळा भरताना प्रथम प्रार्थना व्हायची व नंतर आम्ही सर्व विद्यार्थी शिस्तीने वर्गात प्रवेश करायचो.

आमच्या शाळेत भोसले नावाचे खेळाचे शिक्षक दर शनिवारी एक तास योगा, कवायत, व लेझिम शिकवले जायचे. त्यात ढोल हालकीच्या वाद्यांच्या सुरात कवायत व लेझिम हे प्रकार व्हायचे. ते नुसते आठवले तरी आज मन सुखावून जाते. पण खंत वाटते . आता बहुतेक कुठल्याच शाळेत ते दिसत नाही. आमच्या वेळेला मधली सुट्टी झाली की,

वदनी कवळ घेता नाम घ्या श्री हरीचे।

सहज हवन होते नाम घेता फुकाचे।

जीवन करि जीवित्वा अन्न हे पूर्ण ब्रम्ह,

उदभरण नोहे जाणिजे यज्ञ कर्म।

ही प्रार्थना व्हायची. आजही मी कुठे गावामध्ये जागर किर्तन किंवा मोठ्या पगंती जेवणास बसले की सांप्रदाईक व्यक्ती उभा टाकुन हात जोडुन श्र्वोलोक म्हणतात . आजही एकत्र जेवण्यास बसलो तरी मला त्या प्रार्थनेची आवर्जून आठवण येते.

शाळेतील खेळाचे सामने असो वा इतर सांस्कृतिक कार्यक्रम, त्यातील मजा व आनंद काही औरच असतो. मीही एकदा शाळेमधील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पोवाडय़ात भाग घेतला होता. त्यासाठी लागणारे मावळ्यांचे कपडे व तलवार मिळवताना आमच्या घरच्यांचा अगदी दम निघाला होता. पण माझ्या आईने ते आणले व थोडे कमी करून मला दिले. मग मी पोवाडय़ात भाग घेतला. तो आनंदाचा क्षण मला अजूनही आठवतो. आजही तीच परंपरा आमच्या शाळेनी जपली आहे.

आमच्या शाळेत मुख्याध्यापकांचा एक वेगळाच धाक व शिस्त होती. विद्यार्थी त्यांना शाळे बाहेरही तेवढेच घाबरत होते. तसे आमचे सर्वच शिक्षक विद्यार्थ्यांशी प्रेमाने वागत. जर मस्ती केली व अभ्यास केला नाही तर शिक्षाही करत असत. ती त्यांची एक जबाबदारी होती. कारण याच त्यांच्या शिस्त व कर्तव्यातून उद्याचा एक चांगला नागरिक तयार होणार असतो. सगळेच शिक्षक तत्परतेने व जाणीवपूर्वक विद्यार्थ्यांसाठी तळमळीने ज्ञानदान करित असतात. त्यात आमचे इंग्रजीचे शिक्षक किशन इंदलकर गुरुजी जरा वेगळेच होते. ते प्रत्येक विद्यार्थ्यांशी मैत्रीपूर्वक वागत. स्वत:हून त्याची चौकशी करत. त्यांना अभ्यासात मदत करत. कधी त्यांच्या तासाला ते एखादी छानशी गोष्टही सांगत. त्यामुळे सगळे विद्यार्थी ताजेतवाने होत असत. आमच्या सगळ्याच विद्यार्थ्यांना आमच्या शिक्षकांबद्दल मान-सन्मान होता व तो आम्ही आजही राखला आहे. आमच्या जवळपास राहणारे शिक्षक आजही भेटले व त्यांची आमची बोलचाल झाली व त्यांना आमची प्रगती कळल्यावर ते आवर्जून म्हणतात. आम्ही शिकविले व तुम्ही शिकलात. म्हणून तुम्ही एवढे मोठे झालात. त्यांनाही आपल्या विद्यार्थ्यांबद्दल आपुलकी व अभिमान वाटतो.

आज आमचे शालेय शिक्षण पूर्ण होऊन ३५ ते ४० वर्षे उलटली. पण शाळेतल्या आठवणी तशाच आहेत. कारण आपल्या मुलाला एखाद्या प्रसंगावरून जरी एखादी गोष्ट सांगायची झाली की परत त्या आठवणी ताज्या होतात. म्हणून माणूस कितीही मोठा झाला तरी शाळा व शाळेच्या आठवणी तशाच राहतात. त्या विसरता येत नाहीत व त्या सुख दुखात आठवणी कधीही विसरूही नयेत.

**– ओमप्रकाश तांबोळकर**
पत्रकार शिरूरआनंतपाळ

# आधारवड : डॉ पद्मसिंहजी पाटील साहेब



१ जून हा डॉ पद्मसिंह पाटील साहेब यांचा जन्मदिवस !

विकासाभिमूख नेता, धाडसी आक्रमक पण हळव्या मनाचा नेता. डॉ पद्मसिंह पाटील साहेबांनी ढोकी प्राथमिक आरोग्य केंद्रातून वैद्यकीय व्यवसायास प्रारंभ केला त्यांचे वडील बाजीराव पाटील हे बारा वाड्याचे कारभारी होते. पंचक्रोशीतील लोक त्यांच्याकडे तक्रारी घेऊन येत असत. वडीलांच्या वारसाहक्काने गाव परिसरातील लोकांची काम करत तेर येथून डॉ पाटील साहेब यांनी समाजकार्यास प्रारंभ केला. समाज सेवेचे बाळ कडू घरातूनच मिळाल्यामुळे ते राजकाराणाकडे वळाले. सामान्यातल्या सामान्य माणसाला आपले पणाची वागणूक देऊन ने आस्थेवाईकपणे विचारपूस करत या स्वभावामुळेच ते लवकरच लोकामध्ये लोकप्रिय झाले.

सन १९७४ ला त्यांनी जिल्हा परिषदेत आरोग्य व बांधकाम सभापतीपद भूषवले त्यानंतर १९७८ ला शरद पवार साहेब यांच्या पुलोद सरकारध्ये दारुबंदी व उर्जा खात्याचे राज्यमंत्री म्हणून सतेत सहभाग नोंदवला १९९९ च्या काळात डॉ. पाटील साहेबांनी पाटबंधारे व उर्जा मंत्री म्हणून काम पाहिले याकाळात कोल्हापुरी बंधारे कालवे धरणे यांची निर्मीती केली, साहेबांनी रस्ते, औद्योगीकरण, सहकार या गोष्टीकडे जसे लक्ष दिले त्याहीपेक्षा सिंचनाच्या क्षेत्रात जास्त लक्ष दिले व त्यात धाराशीव जिल्हयाने अघाडी घेतली. त्याचबरोबर सामान्य नागरिकांच्या गोरगरीब लोकांच्या आरोग्याकडे त्यांचे लक्ष होते. जेंव्हा मी प्रचारानिमित्त किंवा इतर कामानिमीत्त ग्रामीण भागात जाते तेंव्हा आजही ग्रामीण भागातील लोक डॉ. साहेबांनी आम्हाला कशी मदत केली ते भावुक होऊन सांगतात. संजय गांधी श्रावण बाळ योजनेचा लाभ लाभार्थ्यांना मिळावा यासाठी ते रात्र - रात्र गावातील चावडीमध्ये बसून फॉर्म भरून घेत महाराष्ट्र मध्ये गरीबांना सर्वात जास्त लाभ मिळवून देणारा आमदार अशी ओळख त्यांची झाली. दुष्काळामुळे मराठवाड्यासह धाराशिव जिल्हा होरपळून निघत आहे. धाराशिवचा पाण्याचा प्रश्र्न कायमचा मिटविण्यासाठी उजनीचे पाणी आणण्याचे काम डॉ. पाटील साहेब यांच्या प्रयत्नामुळे मंजूर झाले व राणादादा यांच्या रुपाने ते पूर्णत्वास आले.

राजकारणात काही चढउतार अनुभवास येतात त्यांनी मोठ्या धीराने त्यावर मात केली, कधी सत्तेची धुंदी चढू दिली नाही की पदाचा मोह धरून उतावळेपणा दाखविला नाही. सामंजस्याने मार्ग काढणे व सर्वांशी प्रेमभाव - राखणारा नेता, कधी मनात वैर किंवा पुर्वग्रहदुषीतपणा ठेवा नाही. सर्वांना मदतीचा हात पुढे करतात. अशा संयमाने विषय हातळण्याचे वैशिष्ट त्यांनी जपले म्हणूनच आज हि त्यांच्या नावाभोवतीचे वलय कमी झालेले नाही. अशा नेत्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना म्हणावेसे वाटते, येणारा प्रत्येक दिवस तुमच्या आयुष्यात भरभरून यश आणी आनंद घेऊन येवो देवाकडे प्रार्थना आहे की आयुष्यात आरोग्य, समृध्दी मिळो वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा.

**– सौ नंदाताई सुरेशराव पुनगडे**
**जिल्हाध्यक्षा भाजप महिला मोर्चा धाराशिव**

## ग्राम पंचयात कार्यालय मलकापुर ता. उदगीर जि. लातूर

### जाहीर प्रगटन

| अ.क्र. | लिहून घेणार | लिहून देणार | मिळकतीचे वर्णन | चर्तु:सीमा | ख.ख.नं. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मंगल हणमंत सुरनर<br>रा. सावळी ता. मुखेड<br>जि. नांदेड | मारोती गंगाधर होळकर<br>रा. मलकापुर ता. उदगीर<br>जि. लातूर | स.नं. 62/1/अ ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं.19<br>पु.प.द.बा 11.15 मी<br>पु.प.उ.बा 11.47 मी<br>द.उ.दो.बा 8.13मी | पूर्वेस:- 9 मी रोड<br>पश्चिमेस :- सर्वे नं 66 ची जमीन<br>दक्षिणेस:- प्लॉट नं 18<br>उत्तरेस:- प्लॉट नं 20 | 2110/<br>16/04/20<br>24 |
| 2 | वर्षा नामदेवराव देवकत्ते<br>रा. उदगीर ता. उदगीर जि. लातूर | मारोती गंगाधर होळकर<br>रा. मलकापुर ता. उदगीर<br>जि. लातूर | स.नं. 62/1/अ ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं.17<br>पु.प.द.बा. 10.23मी<br>पु.प.उ.बा10.82 मी<br>द.उ.दो.बा 8.13मी | पूर्वेस:-9 मी रोड<br>पश्चिमेस :- सर्वे नं 66 ची जमीन<br>दक्षिणेस:- प्लॉट नं 16<br>उत्तरेस:- प्लॉट नं 19 | 2111/202<br>4 |
| 3 | वर्षा नामदेवराव देवकत्ते<br>रा. उदगीर ता. उदगीर जि. लातूर | मारोती गंगाधर होळकर<br>रा. मलकापुर ता. उदगीर<br>जि. लातूर | स.नं. 62/1/अ ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं.18<br>पु.प.द.बा. 10.82मी<br>पु.प.उ.बा 11.15 मी<br>द.उ.दो.बा 8.13मी | पूर्वेस:-9 मी रोड<br>पश्चिमेस :- सर्वे नं 66 ची जमीन<br>दक्षिणेस:- प्लॉट नं 16<br>उत्तरेस:- प्लॉट नं 19 | 2111/202<br>4 |
| 4 | तुळशीदास बाबुराव यचवाड<br>रा. हणमंतवाडी ता. उदगीर<br>जि. लातूर | शंकर आण्णाराव पोस्ते<br>रा. उदगीर | स.नं. 45 ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं. 05<br>पु.प.द.बा. 14.22मी<br>पु.प.उ.बा 14.28 मी<br>द.उ.दो.बा 7.62मी | पूर्वेस:-9 मी रोड<br>पश्चिमेस :- सर्वे नं 45 ची जमीन<br>दक्षिणेस:- प्लॉट नं 6<br>उत्तरेस:- प्लॉट नं 4 | 1457<br>13/03/20<br>24 |
| 5 | जयश्री अनिल घोडके<br>रा. अहमदपूर | मिरा मारोती मिरजकर<br>रा. बेळसांगवी ता. उदगीर | स.नं. 22/3 ग्रा.पं.नं. 1715/1<br>प्लॉट नं. 4 पैकी<br>पु.प. 6.96 मी<br>द.उ. 15.24मी | पूर्वेस:- प्लॉट नं 4 पैकी भाग<br>पश्चिमेस :- श्रीसागर यांचा प्लॉट<br>दक्षिणेस:- 4.57 मी रोड<br>उत्तरेस:- पवार यांचा प्लॉट | 2294<br>24/04/20<br>24 |
| अ.क्र. | लिहून घेणार | लिहून देणार | मिळकतीचे वर्णन | चर्तु:सीमा | ख.ख.नं. |
| 6 | गुरुनाथ दिगंबर बिरादार<br>रा. बनशेळकी ता. उदगीर | शंकर आण्णाराव पोस्ते<br>रा. उदगीर | स.नं. 45 ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं. 04<br>पु.प.द.बा 14.18 मी<br>पु.प.उ.बा 14.15 मी<br>द.उ.दो.बा 7.62मी | पूर्वेस:- 9 मी रोड<br>पश्चिमेस :- सर्वे नं 45 ची जमीन<br>दक्षिणेस:- प्लॉट नं 05<br>उत्तरेस:- प्लॉट नं 03 | 1453<br>13/03/20<br>24 |
| 7 | एकनाथ अर्जुनराव जाधव<br>रा. उदगीर | बालाजी जगन्नाथ चिद्रेवार<br>रा. उदगीर | स.नं. 59 ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं. 02<br>पु.प.द.बा 16.00 मी<br>पु.प.उ.बा 15.75 मी<br>द.उ.दो.बा 9.50मी | पूर्वेस:- 12 मी रोड<br>पश्चिमेस :- प्लॉट नं 7<br>दक्षिणेस:- प्लॉट नं 01<br>उत्तरेस:- प्लॉट नं 03 | 1127<br>16/03/20<br>23 |
| 8 | बालाजी संग्राम पाटील<br>रा. टाकळी ता. देवणी | शंकर आण्णाराव पोस्ते<br>रा. उदगीर | स.नं. 45 ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं. 06<br>पु.प.द.बा 14.25 मी<br>पु.प.उ.बा 14.22 मी<br>द.उ.दो.बा 7.62मी | पूर्वेस:- 9 मी रोड<br>पश्चिमेस :- सर्वे नं 45 ची जमीन<br>दक्षिणेस:- प्लॉट नं 07<br>उत्तरेस:- प्लॉट नं 05 | 1454<br>13/03/20<br>24 |
| 9 | बस्वराज शरणप्पा कांबळे<br>रा. उदगीर | पठाण लईक अब्दुल्लाखान<br>रा. उदगीर | स.नं. 68/2 ग्रा.पं.नं. 4903<br>पैकी<br>प्लॉट नं. 53<br>पु.प. 7.315 मी<br>द.उ. 15.243मी | पूर्वेस:- प्लॉट नं 52<br>पश्चिमेस :- प्लॉट नं 54<br>दक्षिणेस:- पाटील यांची जमीन<br>उत्तरेस:- 6 मी रोड | 2524<br>06/05/20<br>24 |
| 10 | सुरेखा सत्यकुमार बिरादार<br>रा. कुमठा ता. उदगीर | शंकर आण्णाराव पोस्ते<br>रा. उदगीर | स.नं. 45 ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं. 12<br>पु.प.द.बा 14.27 मी<br>पु.प.उ.बा 14.32 मी<br>द.उ.दो.बा 6.70मी | पूर्वेस:- 9 मी रोड<br>पश्चिमेस :- सर्वे नं 45 ची जमीन<br>दक्षिणेस:- प्लॉट नं 13<br>उत्तरेस:- प्लॉट नं 11 | 1530<br>18/03/20<br>24 |
| 11 | प्रदिप पि गोरखानाथ चोले | नंदा भ्र उतम भारती व इतर<br>रा. सोमनाथपूर ता. उदगीर | स.नं. 22/3 ग्रा.पं.नं. 743/1<br>प्लॉट नं. 05<br>पु.प.द.बा 28 फुट<br>पु.प.उ.बा 29 फुट<br>द.उ.पु.बा 50 फुट<br>द.उ.प.बा 40 फुट | पूर्वेस:- खुली जागा<br>पश्चिमेस :- सोनटक्के यांचे घर<br>दक्षिणेस:- रेल्वे लाईन<br>उत्तरेस:- रस्ता | 171<br>2023 |
| 12 | देवकण्या हरिशचंद्र गुरुडे<br>रा. नागतीर्थवाडी ता. देवणी<br>जि. लातूर | गुरुवर्य बिल्डर्स अँड डेव्लपर्स चे पार्टनर महादेव गणपती वैजापुरे व इतर | स.नं. 43/9 ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं. 28<br>पु.प 12.19 फुट<br>द.उ. 9.14 फुट | पूर्वेस:- सर्वे नं 43 ची जमीन<br>पश्चिमेस :- 6 मी रोड<br>दक्षिणेस:- प्लॉट नं 27<br>उत्तरेस:- सर्वे नं 43 ची जमीन | 3326<br>21/08/20<br>23 |
| 13 | सुनिता महेश नीला<br>रा. डिग्रस ता. उदगीर | निवृत्ती दादाराव तिरकमटे<br>रा. वाढवणा खु ता. उदगीर | स.नं. 47 ग्रा.पं.नं. 1962<br>प्लॉट नं. 35<br>पु.प.द.बा 12.80 मी<br>पु.प.उ.बा 13.71 मी<br>द.उ.दो.बा 12.19 मी | पूर्वेस:- 6.09 मी रोड<br>पश्चिमेस :- मुक्कावार यांची प्लोटिंग<br>दक्षिणेस:- प्लॉट नं 46<br>उत्तरेस:- प्लॉट नं 34 | 1876<br>02/04/20<br>24 |
| 14 | आशा भरत सूर्यवंशी<br>रा. नेत्रगाव ता. उदगीर | संग्राम शंकरप्पा हरकरे<br>रा. उदगीर | स.नं. 24/3 अ ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं. 12<br>पु.प. 11.54 मी<br>द.उ. 8.17 मी | पूर्वेस:- 9 मी रोड<br>पश्चिमेस :- प्लॉट नं 07<br>दक्षिणेस:- प्लॉट नं 11<br>उत्तरेस:- प्लॉट नं 13 | 173<br>08/01/20<br>24 |
| 15 | प्रमोद उत्तम चौधरी<br>रा. उदगीर | शंकर आण्णाराव पोस्ते<br>रा. उदगीर | स.नं. 45 ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं. 07<br>पु.प.द.बा 14.28 मी<br>पु.प.उ.बा 14.25 मी<br>द.उ.दो.बा 7.62 | पूर्वेस:- 9 मी रोड<br>पश्चिमेस :- :- सर्वे नं 45 ची जमीन<br>दक्षिणेस:- प्लॉट नं 08<br>उत्तरेस:- प्लॉट नं 06 | 1452<br>13/03/20<br>24 |
| 16 | शरद नारायनराव मोगले<br>रा. ए-9/504 करिश्मा<br>सोयायटी कोथरूड पुणे | मनेश माधव मरेवार<br>रा. उदगीर | स.नं. 46/8 ग्रा.पं.नं. 4224<br>प्लॉट नं. 22<br>पु.प. 19.81 मी<br>द.उ. 14.02 मी | पूर्वेस:- 8.38 मी रोड<br>पश्चिमेस :- :- 3.00 मी रोड<br>दक्षिणेस:- पाटील यांचा प्लॉट<br>उत्तरेस:- अंबेसंगे यांचा प्लॉट | 332<br>17/01/20<br>24 |
| 17 | काशिनाथ विश्वनाथ साकोळकर<br>रा. औरंगाबाद | दुर्गा दत्तात्रय धोंगडे<br>रा. पुणे | स.नं. 59 ग्रा.पं.नं. 3400<br>प्लॉट नं. 25,26,27,28<br>पु.प.दो. बा 24.38 मी<br>पु.प.पु.बा 21.64 मी<br>द.उ.प.बा 20.67 मी | पूर्वेस:- 6 मी रोड<br>पश्चिमेस :- :-6 मी रोड<br>दक्षिणेस:- पेन्सलवार यांची जमीन<br>उत्तरेस:- 9 मी रोड | 4852<br>26/10/20<br>21 |
| 18 | मल्लिकार्जुन इरप्पा काळवने<br>रा. हंडरगुळी ता. उदगीर | सुभाष गुरबसप्पा हुडगे<br>रा. उदगीर | स.नं. 70 ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं. 62<br>पु.प. 50 फुट<br>द.उ. 40 फुट | पूर्वेस:- 30 फुटचा रोड<br>पश्चिमेस :- :- प्लॉट नं 48<br>दक्षिणेस:- प्लॉट नं 63<br>उत्तरेस:- प्लॉट नं 61 | 4768<br>19/12/20<br>07 |
| 19 | प्रमोद प्रल्हाद फुलारी<br>रा. आटोळा ता. चाकूर<br>जि. लातूर | शांतवीर मन्मथप्पा मुळे<br>रा. उदगीर | स.नं. 43/4 ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं. 18<br>पु.प. 12.19 मी<br>द.उ. 8.13 मी | पूर्वेस:- 9 मी रोड<br>पश्चिमेस :- :- ॲम्युनिटी स्पेस<br>दक्षिणेस:- प्लॉट नं 19<br>उत्तरेस:- प्लॉट नं 17 | 2620<br>14/05/20<br>24 |
| 20 | टोंपे विनायक तुकाराम<br>रा. मलकापूर | जयश्री विनायकराव टोंपे<br>रा. मलकापुर | स.नं. 67/2 ग्रा.पं.नं. 3787<br>प्लॉट नं. 07<br>पु.प.द.बा 38.06 फु<br>पु.प.उ.बा 38 फु<br>द.उ.दो.बा 30 फु | पूर्वेस:- वाडगावे ची जमीन<br>पश्चिमेस :- :- 20 फुटचा रोड<br>दक्षिणेस:- प्लॉट नं 06<br>उत्तरेस:- प्लॉट नं 08 | civil no<br>844<br>06/01/20<br>24 |
| 21 | कोंडीराम देविदास शिंदे<br>रा. करडखेल ता.उदगीर | मिलिंद शेषेराव कसबे<br>रा. करडखेल ता.उदगीर | स.नं. 53/1<br>ग्रा.पं.नं. 2477/1<br>प्लॉट नं. 30<br>पु.प. द. बा. 25 फुट पु.प.उ.बा. 26<br>द.उ. 50 फुट | पु – समगे यांची जमिन<br>प – 19 फुटाचा रस्ता<br>द – प्लॉट नं. 31<br>उ – प्लॉट नं.29 | 2771<br>20/05/24 |
| 22 | रवि हरिपंतराव कुलकर्णी<br>रा.होसुर ता.निलंगा | मोमले हंसराज अंतेश्वर उर्फ गंगाधर<br>रा. लोहार ता.उदगीर | स.न. 70 ग्रा.पं.नं. 3899<br>प्लॉट नं. 8<br>पु.प. 45 फुट द.उ. 26 फुट | पु – हुडगे यांची जमिन<br>प – 6 मीटरचा रोड<br>द – प्लॉट नं. 07<br>उ – प्लॉट नं.09 | 4198<br>13/10/23 |
| 23 | महेश हावगीराव शेळके<br>रा. वडगाव एक्की ता. चाकुर | सत्यनारायण सुर्यकांत बच्चा<br>रा. ब्रिदावन नगर सिंकदराबाद | स.न. 27/1 ग्रा.पं.नं. 2742<br>प्लॉट नं. 23<br>पु.प. 12 मी द.उ. 10 मी | पु – 6 मीटरचा रोड<br>प – कोटलवार यांची जमिन<br>द – प्लॉट नं. 22<br>उ – प्लॉट नं. 24 | 4093<br>09/10/23 |
| 24 | प्रकाश पंडीतराव बिरादार व इतर<br>रा.मलकापूर ता.उदगीर | पुजा श्रीराम मुंडे<br>रा. जयाबाईची वाडी ता.उदगीर | स.न. 5/2 ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं. 17<br>पु.प.द.बा. 11.99 मी<br>पु.प.उ.बा. 12.47 मी<br>द.उ.पु.बा. 8.62 मी<br>द.उ.प.बा. 8.47 मी | पु – 6 मीटरचा रोड<br>प – प्लॉट नं. 16<br>द – 6 मीटरचा रोड<br>उ – प्लॉट नं. 18 | 2533<br>08/05/24 |
| 25 | माया दिपक जळकोटे<br>रा. अंबरनाथ ठाणे | गुरूवर्य बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स चे पा.<br>सुरज चंद्रकात वैजापुरे व इतर | स.न. 43/9 ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं. 13<br>पु.प. 12.19 मी द.उ. 9.14 मी | पु – 7.62 मीटरचा रोड<br>प – प्लॉट नं. 08<br>द – प्लॉट नं. 14<br>उ – प्लॉट नं. 12 | 1442<br>11/03/22 |
| अ.क्र. | लिहून घेणार | लिहून देणार | मिळकतीचे वर्णन | चर्तु:सीमा | ख.ख.नं. |
| 26 | दिपक काशिनाथराव जामकर<br>रा. लोणी ता.उदगीर | गुरूवर्य बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स चे पा.<br>सुरज चंद्रकात वैजापुरे व इतर | स.न. 43/9 ग्रा.पं.नं.<br>प्लॉट नं. 12<br>पु.प. 12.19 मी द.उ. 9.14 मी | पु – 7.62 मीटरचा रोड<br>प – प्लॉट नं. 09<br>द – प्लॉट नं. 13<br>उ – प्लॉट नं. 11 | 1443<br>11/03/22 |
| 27 | हाणमंत त्रिबंक भेदे<br>रा. बनशेळकी ता. उदगीर | शेषेराव रामचंद्र बिरादार व इतर<br>रा. घोणसी ता.जळकोट | स.न. 50/1 ग्रा.पं.नं. 3183<br>प्लॉट नं. 2<br>पु.प. 9.14 मी द.उ. 12.19 मी | पु – प्लॉट नं. 09<br>प – कोटलवार यांची मिळकत<br>द – प्लॉट नं. 01<br>उ – 6 मीटरचा रोड | 1496<br>14/03/24 |
| 28 | राहुल कल्याणराव रोडगे<br>रा. देवर्जन त.उदगीर | शंकर आण्णाराव पोस्ते<br>उदगीर ता.उदगीर | स.न. ४५ ग्रा.पं.न.<br>प्लॉट नं. ०८<br>पु.प.द.बा १४.३८ मी<br>पु.पं.उ.बा. १४.२८ मी<br>द.उ.दो.बा. ७.६२ मी | पु- ९मीटर चा रोड<br>प- स.न. ४५ ची मिळकत<br>द- प्लॉट न.९<br>उ – प्लॉट न . ७ | १४६२<br>१३/०३/२४ |

नोट 1. मासिक सभा झाल्यानंतर नं8/अ ची नक्कल मिळेल 2. नजर चुकीचे न्याय प्रतिष्ठ प्रकरण किंवा डबल रेजिस्ट्री (खरेदीखत) नोंद असल्यास रद्द करण्याचे अधिकार ग्राम पंचयातिला आहेत

सरपंच उपसरपंच ग्रामसेवक

# अल-अमीन माध्यमिक विद्यालयाने उज्वल यश

उदगीर (प्रतिनिधी) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातफर्फे मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत अल–अमीन माध्यमिक विद्यालयाने यशाची परंपरा राखत विद्यालयाचा निकाल शंभर टक्के दिला आहे. विशेष म्हणजे सेमी इंग्रजी व उर्दू माध्यम दोन्ही माध्यमांचा निकाल शंभर टक्के लागला आहे. लातूर जिल्ह्यात उर्दू माध्यमांच्या शाळेत एक अग्रेसर नाव अल–अमीनचे आहे.

यावर्षी विद्यालयातून एकूण १४३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यापैकी पाच विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळविले. ४३ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. प्रथम श्रेणीत ५८, द्वितीय श्रेणीत ३१ व यशस्वी श्रेणीत ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शंभर टक्के निकाल देऊन विद्यालयाने यशस्वीतेची परंपरा कायम ठेवली आहे.

शेख फ़रीसा इस्माईल या विद्यार्थिनीने ९१.८० % गुण मिळवून विद्यालयातून प्रथम येण्याचा मान मिळविला. दायमी सयदा ज़ुबिया मुज़म्मील या विद्यार्थिनीने ९१.६०% गुण मिळवून दुसरी तर तंबोली मोहम्मद फ़हद महेमूद या विद्यार्थ्याने ९१.४०% गुण मिळवून विद्यालयातून तिसरा आला आहे. शेख सुफ़्फ़ियान जब्बार ९१.०० गुण मिळवून चौथा तर शेख ज़ुफ़्फ़रा बेगम नाज़ीम ९०.४०% गुण मिळवून विद्यालयातून पाचवा क्रमांकावर आली आहे.

विद्यार्थ्यांच्या व विद्यालयाच्या या यशात विद्यार्थ्यांच्या कष्टाबरोबरच संस्थेचे मार्गदर्शन व सहकार्य तसेच प्राचार्या सय्यदा आज़ेमा बेगम, पर्यवेक्षक गुलाम ग़ौस खान, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचाही महत्त्वाचा वाटा आहे.

विद्यार्थ्यांच्या व विद्यालयाच्या या यशाबद्दल अल–अमीन शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष माननीय डॉक्टर इसाखान साहेब, सचिव माननीय शेख अकबर साहेब व इतर पदाधिकाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# कु.समीक्षा बरमे हिचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश



उदगीर (प्रतिनिधी) मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी परिक्षेत मराठवाडा विघालय चेरा येथील विद्यार्थीनी कु.समीक्षा सुर्यकांत बरमे हिने दहावीच्या परीक्षेत ९०% गुण घेवून यश संपादन केले आहे. आजच्या काळात ग्रामीण भागातील नागरिक शिक्षणासाठी शहराकडे धाव घेत आहेत.परंतु समीक्षा बरमे हिच्या यशामुळे ग्रामीण भागातून कौतुक होत आहे.

तिच्या यशाबद्दल मराठवाडा विद्यालयाचे मुख्याध्यापक देशमुख एस. एस, शाळेचे सहशिक्षक पाटील आर एन , .कदम बी एम , वाघमारे डी यु , केंद्रे एन आर, याच्यासह मित्र परिवार, नातेवाईक ई अभिनंदन केले आहे.

# शिवाजी विद्यालय रोहिण्याची यशस्वी निकालाची परंपरा कायम

उदगीर (प्रतिनिधी) शिवाजी विद्यालय रोहिण्याचा शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२४ निकाल १००% लागला असून सर्वप्रथम नागरगोजे ज्ञानेश्वर अनंत ९२.४०%, द्वितीय क्रमांकावर वाघमारे आकांक्षा ८७.४०%, तृतीय क्रमांकावर शेख सीमा अकबर ८५.८०% घेऊन मिळवला असून विशेष प्राविण्य प्राप्त पाच प्रथम श्रेणी १२ द्वितीय पाच विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून सर्व यशवंत विद्यार्थ्याचे संस्था अध्यक्ष मा. सुपोषपाणी आर्य, उपाध्यक्ष मा. गिरीश मुंडकर, सचिव मा. विक्रम संकाये सहसचिव मा. अंजुमनी आर्य मॅडम यांनी अभिनंदन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक उन्नतीसाठी परिश्रम करणारे या विद्यालयाचे मुख्याध्यापक आनंद चोबळे शिक्षक चेरेकर विष्णुकांत, कोयले संतोष, जमादार विकास, सगर जयश्री, जाधव कालींदा तसेच सर्व ग्रामस्थांनी सर्व यशवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# माध्यमिक आश्रम शाळा चिंचोली- अतनूर चे दहावी परीक्षेत नेत्रदीपक यश



**अतनूर / प्रतिनिधी** जळकोट तालुक्यातील माध्यमिक आश्रम शाळा चिंचोली–अतनूर येथील इयत्ता दहावीच्या मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र ( इ १० वी) परीक्षेमध्ये दहावीच्या निकालाची उज्वल परंपरा याही वर्षी कायम राखली आहे. राठोड कृष्णा सोपान ९३.६० टक्के गुण घेऊन प्रथम आला. तर राठोड श्रीशा बालाजी ९१.२० टक्के गुण घेऊन द्वितीय आली. असून तृतीय क्रमांकाने राठोड बबन रमेश ९१.८० टक्के उत्तीर्ण झाला. शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून परीक्षेत ६९ विद्यार्थी बसले होते. यापैकी विशेष प्राविण्यात ५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, १४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. ३ विद्यार्थी द्वितीय श्रेणी पास झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष भिमराव राठोड, प्राचार्य जय राठोड, मु.अ.सुमित राठोड, उप.मु.अ.केदार, वर्ग शिक्षक डांगे, जाधव, मुर्के, गव्हाणे, घाटे, राठोड, सौ.दिग्रसकर मॅडम, खंबाळे, गरुडकर, राचमाळे, मुंजेवार, कुंजटवाड, केंद्रे, दहीकांबळे, मठपती, सौ.चव्हाण मॅडम, वस्तीगृह अधिक्षक आडे, वस्तीगृह अधिक्षका सौ.राठोड मॅडम , प्राध्यापक वर्ग आर्दीनी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### टी.सी हरवली आहे

माझी ऋतुजा दिलीप कप्ते या नावाची इ. १२ वी पासची टि. सी. दि. ०२ मे २०२४ रोजी उमाचौक ते बसस्टॅड दरम्यान प्रवासात हरवली आहे. जर कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.





उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०

दररोज ४ शो



उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|
| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया | | |

मराठवाड्यात एक अद्यावत नेत्र रुग्णालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेद्रे सचिव



# लोकसभा मतदारसंघाच्या मत मोजणीची तयारी पूर्णः डॉ. ओंबासे

## मतमोजणी केंद्रावर मोबाईल घेऊन जाण्यास प्रतिबंध



धाराशिव दि.३१ (प्रतिनिधी) ४० - उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघाच्या सार्वत्रिक निवडणुकीची मत मोजणी येत्या ४ जून रोजी शासकीय तंत्रनिकेतन येथे सकाळी ८ वाजल्यापासून सुरु होणार आहे. मत मोजणीची तयारी पूर्ण झाल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ सचिन ओंबासे यांनी दि.३१ मे रोजी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक गौहर हसन, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिरीष यादव, उपजिल्हाधिकारी उदयसिंह भोसले व उपजिल्हाधिकारी राऊत आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. ओंबासे म्हणाले की, शासकीय तंत्रनिकेतन येथील स्ट्राँग रूम अर्थात सुरक्षा कक्षात ईव्हीएम मशीन ठेवण्यात आल्या असून या स्ट्राँग रूमचे सील सकाळी ६.३० वाजता उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत उघडण्यात येणार आहे.टपाली मतपत्रिका ह्या कोषागार कार्यालयातील स्ट्राँग रूम येथे ठेवण्यात आल्या आहेत. दि.४ जून रोजी सकाळी ६ वाजता या टपाली मत पत्रिका शासकीय तंत्रनिकेतन येथील मत मोजणी केंद्रावर घेऊन जाण्यात येणार आहेत. ३९७९ दिव्यांग मतदार आणि ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक, भारतीय सैन्यात कर्तव्यावर असलेल्या जिल्ह्यातील १८१० भारतीय सैनिकांनी आणि सुविधा केंद्रात मतदान केलेल्या ३४४२ मतदारांचे असे एकूण ९२३१ मतदारांच्या टपाली मत पत्रिकांची मोजणी सकाळी ८ वाजता सुरू करण्यात येणार आहे. तर सकाळीच ८.३० वाजता मतदान यंत्राद्वारे करण्यात आलेल्या मतदानाची मतमोजणीला सुरुवात होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच औसा विधानसभा मतदारसंघातील मत मोजणी हॉल क्रमांक ११९ मध्ये १४ टेबलवर होणार असून मत मोजणीच्या २२ फेऱ्या, उमरगा विधानसभा मतदारसंघाची मत मोजणी हॉल क्रमांक १११ मध्ये १४ टेबलवर २३ फेऱ्यांमध्ये, तुळजापूर विधानसभा मतदारसंघातील मतदानाची मत मोजणी हॉल क्रमांक २०८ मध्ये १४ टेबलवर २९ फेऱ्यांमध्ये, उस्मानाबाद विधानसभा मतदारसंघातील मतांची मत मोजणी हॉल क्रमांक २०३ मध्ये १४ टेबलवर ३० फेऱ्यांमध्ये, परंडा विधानसभा मतदारसंघाची मत मोजणी हॉल क्रमांक २०६ मध्ये १४ टेबलवर २७ फेऱ्यांमध्ये आणि बार्शी विधानसभा मतदारसंघाची मत मोजणी हॉल क्रमांक २०९ मध्ये १४ टेबलवर २४ फेऱ्यांमध्ये होणार आहे. तर टपाली मत पत्रिकेची मत मोजणी हॉल क्रमांक १२४ आणि १२७ मध्ये होणार असून या हॉलमध्ये प्रत्येकी ८ टेबलवर आणि भारतीय सैन्यातील कर्तव्यावर असलेल्या जिल्ह्यातील भारतीय जवानांच्या मतदानाची मतमोजणी हॉल क्रमांक १०२ मध्ये सहा टेबलवर होणार असल्याचे डॉ. ओंबासे यांनी सांगितले. तसेच भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मतमोजणी केंद्राच्या १०० मीटर अंतरापासून मत मोजणी केंद्रावर पायी चालत यावे लागणार असून मत मोजणी केंद्रावर वाहन पार्किंगची वेगळी व्यवस्था करण्यात आली असून जागा देखील निश्रि्चत करण्यात आली आहे. मत मोजणी केंद्रावर उमेदवार प्रतिनिधींना मोबाईल घेऊन जाण्यास प्रतिबंध राहणार आहे. मत मोजणी केंद्रावर सशुल्क भोजन व्यवस्था राहणार आहे. मत मोजणीसाठी जवळपास १५०० अधिकारी - कर्मचारी असतील. विधानसभा मतदारसंघनिहाय ६ सभागृहात मतमोजणीचे काम १२०० अधिकारी कर्मचारी करणार आहेत. शासकीय तंत्रनिकेतन येथे ६ मोठे सभागृह असल्यामुळे मत मोजणीची अतिशय चांगली व्यवस्था उपलब्ध आहे. ईव्हीएम मशीन ज्या स्ट्राँग रूममध्ये ठेवण्यात आल्या आहेत तेथून ते मत मोजणी कक्षापर्यंत सीसीटीव्हीची व्यवस्था करण्यात आली आहे. मत मोजणीसाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या अधिनस्त अधिकारी कर्मचारी मतमोजणी करून ती एक्सेल शीट तसेच मॅन्युअलमध्ये करून खात्री करूनच शपलीश ऍपवर अपलोड करतील. ही माहिती थेट शलळ. र्सीं.ळप या आयोगाच्या संकेतस्थळावर पाहता येणार असल्याचे त्यांनी सांगितले. दि.३ जून रोजी सकाळी १० वाजता मतमोजणी केंद्र येथे मत मोजणीची रंगीत तालीम होणार असल्याचे सांगून ते म्हणाले की, मत मोजणी केंद्रावर माध्यमांच्या प्रतिनिधींना व्यवस्थित वृत्त संकलन करता यावे यासाठी माध्यम कक्ष हॉल क्रमांक १०३ मध्ये सुरू करण्यात येणार आहे. ज्या माध्यमांच्या प्रतिनिधी व त्यांच्या कॅमेरामनकडे भारत निवडणूक आयोगाचे विहित नमुन्यातील प्राधिकार पत्र दिले आहे केवळ त्यांनाच मत मोजणी केंद्रात प्रवेश देण्यात येणार आहे. माध्यम प्रतिनिधींना मत मोजणीचे वृत्तसंकलन करताना अडचण येऊ नये यासाठी त्यांना मोबाईल, कॅमेरा व व्हिडिओ कॅमेरा व संबंधित साहित्य मत मोजणी केंद्रात घेऊन जाता येईल. मात्र यासाठी जिल्हा माहिती अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरुपात कोणते साहित्य मत मोजणी केंद्रावर घेऊन जाणार आहात याबाबतचे लेखी स्वरुपात कळवावे लागणार आहे. लेखी कळविल्यानंतरच जिल्हा माहिती अधिकारी हे त्याबाबत जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना लेखी स्वरुपात कळविल्यानंतरच संबंधित माध्यमांच्या प्रतिनिधींना साहित्य मत मोजणी केंद्रावर सोबत घेऊन जाता येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच मत मोजणी केंद्रावर अधिकारी, कर्मचारी व उमेदवार प्रतिनिधी यांना ओळखपत्राशिवाय प्रवेश मिळणार नाही. मत मोजणी प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी उमेदवार, उमेदवार प्रतिनिधी, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक व पत्रकार बांधवांनी सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले.

मत मोजणी केंद्रावर पोलिस बंदोबस्ताबाबत पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी म्हणाले की, ४०० पोलीस कर्मचारी आणि ५० पोलीस अधिकारी असा एकूण ५०० पोलिसांचा तगडा पोलीस बंदोबस्त मत मोजणी केंद्रावर राहणार आहे. याबरोबरच केंद्रीय राखीव पोलीस दल, राज्य राखीव पोलीस दल आणि जिल्हा पोलिसांची त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था मत मोजणी केंद्रावर राहणार असून मत मोजणी केंद्रात मोबाईल सोबत घेऊन जाण्यास परवानगी राहणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

## लातूर येथील सैनिकी मुला-मुलींच्या वसतिगृहाची प्रवेश प्रक्रिया ३ जूनपासून सुरु

लातूर, / प्रतिनिधी- येथे आधुनिक पध्दतीच्या सर्व सोयी उपलब्ध असलेल्या सैनिकी मुला-मुलींच्या वसतिगृहात सन २०२४-२०२५ मध्ये शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींसाठी प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. प्रवेश घेण्यास इच्छुक मुला-मुलींसाठी ३ जून २०२४ पासून प्रवेश पुस्तिका वाटप सुरू करण्यात येणार आहे.

सर्व माजी व आजी सैनिकांच्या तसेच युध्द विधवा व माजी सैनिक विधवांच्या मुला-मुलींना पहिल्या टप्यात प्रवेश दिला जाणार आहे. तसेच पूर्ण शैक्षणिक वर्ष चालू असणारे व कमीत कमी दररोज ६ तासपेक्षा जास्त शिकवणी घेत असलेल्या खाजगी शिकवणी वर्गाच्या बोनाफाईडधारक माजी सैनिक, आजी सैनिक तसेच युध्द विधवा व माजी सैनिक विधवांच्या पाल्यांना दुसरा टप्यात प्रवेश देण्यात येणार आहे. प्रवेश प्रक्रियेत जागा पूर्ण भरल्या नसल्यास उर्वरित जागेसाठी संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांच्या परवानगीने नागरी मुलां-मुलींना तिसरा टप्प्यात वसतिगृहात प्रवेश देण्यात येणार आहे.

वसतिगृहात उपलब्ध सुविधा

उत्तम भोजन व्यवस्था, राहण्याची उत्तम सोय, अभ्यास व वाचनालयाची सोय, मनोरंजन व्यवस्था, खेळासाठी प्रशस्त मैदान, गरम पाण्याची सोय, सी. एस. डी. कॅन्टीन व ईसीएचसीची सुविधा, सुरक्षेची योग्य सोय, २४ तास लाईट व पाण्याची सोय, शिस्तबंध व प्रसन्न वातावरण सकाळचा व्यायाम आदी सुविधा पुरविण्यात येतील.

भोजन आणि निवास भाडे

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून भोजन व निवास भाड्याचे प्रतिमाह नवीन दर निश्रि्चत करण्यात आले आहेत. त्यामध्ये सेवारत सैनिकांचे पाल्य आणि नागरी पाल्यांसाठी निवास १ हजार ५००, भोजन २ हजार असे एकूण ३ हजार ५०० शुल्क आकारले जाईल. सेवारत जे.सी.ओ. यांच्या पाल्यांसाठी निवासाचे १ हजार रुपये आणि भोजनाचे २ हजार रुपये असे एकूण ३ हजार रुपये, तर सेवारत शिपाई अथवा एनसीओ यांच्या पाल्यांसाठी निवासाचे ८०० रुपये आणि भोजनाचे २ हजार रुपये असे एकूण २ हजार ८०० रुपये दरमहा शुल्क आकारले जाईल. माजी सैनिक अधिकारी यांच्या पाल्यांसाठी निवासाचे १ हजार रुपये, भोजनाचे २ हजार रुपये असे एकूण ३ हजार रुपये, माजी सैनिक जे.सी.ओ. यांच्या पाल्यांसाठी निवासाचे ८०० रुपये आणि भोजनाचे २ हजार रुपये असे एकूण २ हजार ८०० रुपये दरमहा शुल्क आकारले जाईल. तसेच माजी सैनिक शिपाई, एनसीओ यांच्या पाल्यांसाठी ५०० रुपये निवास आणि २ हजार रुपये भोजन असे एकूण २ हजार ५०० रुपये दरमहा शुल्क आकारले जाईल. युद्ध विधवा व माजी सैनिक विधवा यांच्या पाल्यांना राहण्याची व भोजनाची व्यवस्था निशुल्क राहील.

प्रवेश प्रक्रिया वसतिगृह प्रवेश पुस्तिकेतील नियम व अटीप्रमाणे नमूद प्राधान्यक्रमाने होईल. अधिक माहितीसाठी लातूर शहरातील अंबाजोगाई रोडवरील मेडिकल कॉलेजसमोरील सैनिक संकुल येथील सैनिकी मुला-मुलींच्या वसतिगृहाचे अधीक्षक, अधीक्षिका यांच्याशी किंवा ०२३८२-२२८५४४ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद प्रकाश पांढरे (नि.) यांनी केले आहे.

## महाविकास आघाडीच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन

**प्रशांत तांबोळकर**

शिरूर अनंतपाळ : तालुक्यातील व शहरातील अनेक विषयांवर कॉंग्रेस पक्षाचे नेते डॉ.अरविंद भातांब्रे यांच्या नेतृत्वाखाली शिरूर अनंतपाळ तालुक्याचे तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले या वेळी महाविकास आघाडीच्या वतीने १)शिरूर अनंतपाळ तालुक्यातील व शहरातील जनतेला प्रचंड मोठ्या पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे अश्या टंचाईग्रस्त गावांना तात्काळ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी २)शेतातील पाळीव जनावरे व मोकाट असलेल्या प्राणीमात्रांना ही सुरक्षित पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी३)प्रचंड उष्णतापमान वाढल्याने व शेतीमध्ये पाणी नसल्याने जनावरांना खाण्यासाठी चारा उपलब्ध नसल्याने आवश्यकतेनुसार चारा छावणी निर्माण करावी किंवा शासन स्तरावरून स्थानिक विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी यांना चारा उपलब्ध करून देऊन शेतकरी बांधवांना वितरीत करण्यात यावे ४)१० वी व १२ वी परिक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी टी.सी काढते वेळी विद्यार्थीकडून काही शैक्षणिक संस्था विनाकारण फि आकारणी केली जात आहे .

तरी या आर्थिक लुटीसाठी एक टीम करून पाहाणी व्हावी व लुट करणाऱ्या संस्थेचा प्रेवेश परवाना रद्द करण्यात यावा ५)शिरूर अनंतपाळ नगरपंचायतच्या माध्यमातून गेल्या दोन वर्षांपासून अनेक बोगस कामे झाली आहेत या झालेल्या विकास कामांची चौकशी करण्यासाठी तज्ञांची समिती गठीत करण्यात यावी६)शहरात टंचाईच्या नावाखाली शिरूर अनंतपाळ नगरपंचायतच्या वतीने सन.२०२१-२२,सन.२०२२-२३,सन.२०२३-२४ मध्ये किती विंधन विहिरी (बोर) पाडण्यात आले व ते कोठे कोठे पाडण्यात आले याची पाहणी करून यावर किती खर्च झाला यांची माहिती मिळावी,७)शिरूर अनंतपाळ नगरपंचायतच्या वतीने शहरात कचरा विल्हेवाट,व्यवस्थापन करण्याचे काम चालू असून या कामावर किती खर्च आहे या बाबतीत बोर्ड लावलेला नसून हे काम कश्या पद्धतीने राबविण्यात येत आहे यांचे अंदाज पत्रक सुद्धा त्या ठिकाणी उपलब्ध नाही संबंधित कामावर काम कोणत्या योजनेतून आहे व या कामासाठी किती लाख रुपये खर्च आहे.

या बाबतीत बोर्ड लावण्यात यावा तसेच हे काम अंदाज पत्रकान्वये होत आहे का नाही या बाबतीत आपण पाहणी करावी,८) नगरपंचायतच्या माध्यमातून ज्या ज्या ठिकाणी विकास कामे झाली त्या ठिकाणी किती लाख रुपये खर्च करून कुठून कुठपर्यंत काम होते या बाबतीत बोर्ड लावण्यात यावा जेणेकरून शहरातील जनतेला सुद्धा जनतेचा पैसा योग्य मार्गावर खर्च होत आहे का नाही हे लक्षात येईल अश्या अनेक विषयांवर निवेदन देऊन तात्काळ उपाययोजना करण्यात यावा तसेच शिरूर अनंतपाळ नगरपंचायतच्या वतीने होत असलेल्या चुकिच्या कामाची चौकशी करण्यात यावी अशी मागणी कॉंग्रेस पक्षाचे नेते डॉ अरविंद भातांब्रे व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली .

## राष्ट्रीय महामार्गावरील तात्या चौकातील हायमास्ट पथदिवे बंद

अहमदपूर दि. २९ (कारामुंगीकर) शहरालगत गेलेल्या राष्ट्रीय महामार्गावरील तात्या चौकापासून पथदिवे बसवले असून ते पथदिवे गेल्या काही दिवसापासून बंद पडल्यामुळे राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक रात्रीच्या वेळी अंधारात सुरू असल्यामुळे असुरक्षितता वाढली आहे. एवढेच नव्हे तर काही वेळा रात्रीच्या अंधारात अपघात ही घडले आहेत. या पार्श्वभूमीवर पथदिवे सुरु करण्यासाठी संबंधित यंत्रणेने योग्य ती उपाययोजना करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

याविषयीची माहिती अशी की, अहमदपूर शहरालगत गेलेल्या राष्ट्रीय महामार्गावरील मतात्याफ पेट्रोलियम व सीएनजी गॅस च्या बाजूला असलेल्या तात्या चौका पासुन ते मरशीवणी पर्यंतच्या राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या हायमास्ट पथदिवे बंद पडले असुन नवीन झालेला राष्ट्रीय महामार्ग काही दिवस उजळून निघाला तर सध्या अंधारातच असल्याचे दिसून येत आहे.

यामुळे तात्या चौकात अनेक भीषण अपघात झालेले असुन बहुतांश अपघात हे भरधाववेगाने जाणाऱ्या वाहनांचे झाले असून आता या ठिकाणचे पथदिवे बंद असल्याकारणाने रस्ता ओलांडताना अपघाताचे प्रमाण वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महामार्ग प्राधिकरणाने याकडे विशेष लक्ष देऊन बंद पडलेले पथदिवे त्वरित चालू करावेत व पथदिव्यांची देखभाल वेळच्या वेळी नियमितपणे करण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा सज्ज करावी, अशी मागणी शहरवासीय, वाहनधारक व परिसरातील खेड्यापाडयातील नागरीक करीत आहेत.

मतात्याफ चौक ते मरशिवणी पर्यंत दोन पूल उभारण्यात आलेले असून त्या ठिकाणी विजेचे खांब असुनही हे पथदिवे शो-पीस ठरत आहेत. शहरालगत महामार्ग अजूनही अंधारात ठेवण्यामागे गौडबंगाल काय? असा प्रश्न नागरीक व वाहनचालक करित आहेत. दळणवळण सोयीस्कर व्हावे यासाठी सर्वत्र महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग बांधले गेलेत. परंतू शहरातील नागरिक मोठ्या संख्येने शहराबाहेर जाऊन याच महामार्गावर मॉर्निंग वॉकला जातात. यामध्ये महिलांची सख्या जास्त आहे. शिवाय महामार्गावर असलेल्या माळेगाव खु., टेंभुर्णी सह शहरातील नागरीक गावकरी पहाटे फिरायला जातात. मनमोकळ्या गप्पा आणि फिरणे म्हणजे ही एक मैफिलच झालेली असते. अनेक जण पहाटे-पहाटे अंधारातच फिरायला जातात जे धोकादायक ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## आ.आव्हाड व मंत्री केसरकरांचा वंचित बहुजन आघाडी कडून निषेध

लातूर - डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा असलेला फोटो राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी फाडल्याचा निषेध तसेच मंत्री दीपक केसरकर यांनी अभ्यासक्रमात मनुस्मृतीचे श्र्लोक समाविष्ट करावी या वक्तव्याचा निषेध वंचित बहुजन आघाडी लातूर शहर च्या वतीने शहरातील महात्मा गांधी चौक येथे व्यक्त करण्यात आला. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे ,लातूर शहर जिल्हाध्यक्ष सचिन गायकवाड, शहर महासचिव इसाक शेख, शहर संघटक रतन टेंकाळे,शहर सचिव मनोज लेंढाने, धरणीदर सोनवणे,विशाल कांबळे, शहरआयटी प्रमुख विशाल सुरवसे, शहर प्रसिद्धीप्रमुख विशाल सुरवसे, सद्दाम पठाण,अमोल कऱवजे,महिला शहराध्यक्ष सुजाताई अजनीकर,सामाजिक कार्यकर्ते नूतन हनुमंते व सहकारी जिल्हा महासचिव ॲड.रोहित सोमवंशी, जिल्हा सचिव प्रशांत उघाडे, सुरेशभाऊ सूर्यवंशी,सुनील कांबळे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष एम एम बलांडे गुरुजी , समता सैनिक अभिमन्यू लामतुरे,संग्राम माने,दादासाहेब मस्के,शुभम बनसोडे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.


### जाहीरनामा

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार चाकूर, यांचे कार्यालय**

**(दंडणीय - विभाग)**

**जा.क्र.२०२४/एमएजी/कावि** **दि. ३१/०५/२०२४**

**अर्जदार :-** श्री. सय्यद खालीद हसनसाब

विरुध्द

**गैरअर्जदार :** मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय, चाकुर

**अर्ज :-** कलम १३(३) जन्म-मृत्यु नोंदणी कायदा.

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार श्री. सय्यद खालीद हसनसाब रा.चाकुर ता. चाकुर जि. लातुर यांनी १३ (३) जन्म-मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार स्वतः चा जन्म दि. ०३/०९/१९७९ रोजी राहत्या घरी झाला असुन मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकुर ता. चाकुर जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने तीच्या जन्म तारखेची नोंदनी मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकुर ता. चाकुर जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोनाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.

दि.३१/ ५/ २०२४

पुढील तारीख ३ / ७ / २०२४

**आदेशावरून**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार,**
**तालुका दंडाधिकारी, चाकूर**

### जाहीरनामा

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार चाकूर, यांचे कार्यालय**

**(दंडणीय - विभाग)**

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि दि. २७/५/ २०२४

अर्जदार:- श्री. शेख महताब खाजामाव

विरूध्द

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी नगर पंचायत ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय, मोहनाळ

अर्ज :- कलम १३(३)

**जन्म-मृत्यु नोंदणी कायदा**

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार श्री. शेख महताब खाजासाब रा. मोहनाळ ता. चाकुर जि. लातुर यांनी १३ (३) जन्म-मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार यांचा स्वतः चा जन्म दि. १४/०१/१९७६ रोजी राहत्या घरी झाला असुन मुख्याधिकारी नगर पंचायत ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय मोहनाळ ता. चाकुर जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने तीच्या जन्म तारखेची नोंदनी मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय मोहनाळ ता. चाकुर जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यानी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन १० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात, सदर कार्यालयामध्ये कोनाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही. दि.२७/५/ २०२४, पुढील तारीख, २८/६/२०२४

**आदेशावरुन**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, तहसील कार्यालय, चाकुर**

**ह्युमन पॉवर एज्युकेशन सोसायटी औसा, ता. औसा जि. लातूर द्वारा संचलित**

**एच.पी.उर्दु सायन्स ज्युनिअर कॉलेज, चौधरी नगर, लातूर**

**(शासनमान्य अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त व अंशतः अनुदानित)**

**पाहिजेत**

| अ.क्र. | पद | शैक्षणिक पात्रता | पदसंख्या |
|---|---|---|---|
| ०१ | प्रयोगशाळा सहाय्यक | १२ वी सायन्स उत्तीर्ण | ०१ |

आमच्या संस्थेच्या अंशतः अनुदानित एच.पी. उर्दू सायन्स ज्युनियर कॉलेजमध्ये वरील रिक्त जागा भरावयाची आहे.

तरी पात्र उमेदवारांनी खालील पत्यावर शनिवार दिनांक ०८/०६/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता एच.पी. उर्दू सायन्स ज्युनियर कॉलेज चौधरी नगर, लातूर येथे मूळ कागदपत्रासह मुलाखतीस स्वतः खर्चाने उपस्थित रहावे.

**सचिव**
**ह्युमन पॉवर एज्युकेशन सोसायटी, औसा ता. औसा जि. लातूर**

**स्वाक्षरीत**
**प्राचार्य**
**एच.पी.उर्दू सायन्स ज्युनिअर कॉलेज चौधरी नगर, लातूर**

### कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

### मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

**प्रो. योगेश कुमार**

स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.

संपर्क 99 93 94 16 69 / 98 98 20 38 88

### नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

**मिलनम डे**

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

**कल्याणम**

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

**मुंबैम (मेन)**


| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०-७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26

लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर
नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना

| कालावधी | व्याजदर |
| --- | --- |
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

९% आवर्त ठेव द.सा.द.शे, ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवींवर नियम व अटी लागु.



यशवंत
शनिवार दि. १ जून २०२४
उदगीर
पान ८
कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com

बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.
शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरीक व महिलांसाठी व्याजदर |
| --- | --- | --- |
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

उपलब्ध सुविधा
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमएस बँकींग, मोबाईल बँकींग

# खरिप हंगामासाठी मुबलक खत, बियाणे उपलब्ध - आकाश पवार



**जळकोट (माधव होनराव)** तालुक्यातील शेतकऱ्यांनी खरीप हंगामाच्या पेरणीकरिता पूर्वतयारी सुरू केली असून कृषी विभागही कामाला लागला आहे. या हंगामासाठी ४ हजार ९३२ मे. खते व ३ हजार क्विंटल सोयाबीन बियाणे जळकोट तालुक्यासाठी उपलब्ध झाले आहे, अशी माहिती जळकोटचे तालुका कृषी अधिकारी आकाश पवार यांनी दिली. खरीप हंगामासाठी जळकोट तालुक्याकरिता युरिया ९६८ मे. टन, डीएपी ९६८ मे. टन, एमओपी ९२ मे. टन, एन. पी. के. २१५२ मे. टन, एसएसपी ७५२ मे. टन असे एकूण ४९३२ मे. टन खत उपलब्ध झाला आहे तसेच तीन हजार क्विंटल सोयाबीन बियाणे बाजारात उपलब्ध झालेले आहे असेही त्यांनी सांगितले. तालुक्यातील शेतकऱ्यांची दयनीय अवस्था पाहता खरिप हंगाम २०२४ साठी रासायनिक खते व बी बियाणे चढ्या दराने विक्री होणार नाहीत व रास्त भावातच मिळतील अशी व्यवस्था करावी, अशी मागणी पुढे आली आहे.

मागील काही वर्षांपासून जळकोट तालुक्यातील शेतकरी हे निसर्गाच्या लहरीपणामुळे पिके करपून जाणे, अतिवृष्टीने पिके वाहून जाणे, दुबार पेरणी करणे, कमी उत्पादन, नापिकी अशा जीवघेण्या संकटांचा मुकाबला करीत आहेत. दुष्काळाने शेतकऱ्यांचे कंबरडेच मोडले आहे. त्यामुळे खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना योग्य दरात बी बियाणे व खते मिळतील याची खबरदारी कृषी विभागाने घ्यावी. जादा दराने विक्री करणाऱ्या कृषी सेवा केंद्र चालकाविरुद्ध कडक कारवाई करावी अशी मागणी पाटोदा (बु) येथील शेतकरी व उपसरपंच लहुकुमार माडे यांनी केली आहे.

# अक्षरनंदन शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**उदगीर (प्रतिनिधी)** अक्षरनंदन हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवित यश संपादन करत यशाची परंपरा कायम राखली. यावेळी विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये बेदडे गायत्री , भालके ओमकार , शेख मुखीद, पंढरपुरे चेतन, दिघे समर्थ, मटके समीक्षा, येगाडे स्नेहल, इंद्राळे ऋषिकेश. या गुणवंताचा समावेश होता.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माधवराव हालगरे समर्थ सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष भारत भाई सावळे , माध्यमिक विभागाचेमुख्याध्यापक एम. टी बिरादार , प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक शिवशंकर जीवने , वाय.एन शेख , शेख , खांबाळकर , गायकवाड आदीसह प्राथमिक आणि माध्यमिक विभागाचे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती श्यामलाल हायस्कूल मध्ये उत्साहात साजरी



**उदगीर (प्रतिनिधी)** येथील श्याम लाल हायस्कूल मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी श्यामलाल मेमोरियल हायस्कूल चे मुख्याध्यापक बालाजी चव्हाण प्रभारी पर्यवेक्षक राहूल लिमये तसेच जेष्ठ शिक्षक वसंत गोखले, संजय देबडवार, नारायण कांबळे,कावरे प्रमोद,सईदशेख, अविनाश घोळवे, सुनिल पुल्लागोर ,गोविंद कदम, दिनेश बोळेगावे, प्रा. संतोष सगर, राजारूपे शिवाजी,विजय बैले, हुरदळे सतनप्पा प्रा. भारत खंदारे, ऐतनबोने शिलन, चंदे अंजली यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी अठराव्या शतकात अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये राज्यकारभार सुरळीत करून सामान्य जनतेला न्याय देण्याचे मोलाचे कार्य केले, मोठया प्रमाणात मंदिराचा जीर्णोद्धार करून संस्कृती रक्षणाचे महत्वाचे कार्य केले, एक स्त्री असूनही अतिशय प्रभावी रित्या राज्यकारभार करून शत्रूवर आपला वचक निर्माण करण्याचे कार्य अहिल्यादेवींनी केले हे विशेष.असे मनोगत मुख्याध्यापक बालाजी चव्हाण यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार व्यक्त करण्याचे कार्य उमाकांत सूर्यवंशी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी रित्या संपन्न झाला.

# यशवंत विद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी



अहमदपूर (कारामुंगीकर) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती यशवंत विद्यालयाच्या प्रांगणामध्ये अत्यंत उत्साहाच्या वातावरणामध्ये साजरी करण्यात आली.

यावेळी प्राचार्य गजानन शिंदे यांच्या हस्ते पुण्यश्रलोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी उप प्राचार्य प्रा. मुजमील सय्यद, पर्यवेक्षक राम तत्तापुरे, कवी प्रा.अनिल चवळे, संतोष पारशेट्टे, युवराज पाटील, भीमराव कांबळे, गहिनीनाथ शिरसागर, श्रीरंग पदातुरे, मोहन कांबळे, रोहन बिराजदार, माधव कांबळे, दिगंबर ढवळे यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचलन संतोष पाटील यांनी केले तर आभार हनुमंत सुडे यांनी मानले.

# अहिल्यादेवी माध्यमिक विद्यालयात अहिल्यादेवी जयंती साजरी



**उदगीर (प्रतिनिधी)** अहिल्यादेवी माध्यमिक विद्यालय मादलापूर उदगीर येथे सकाळी ठीक नऊ वाजता अहिल्यादेवी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी शाळेचे मुख्याध्यापक १ साबणे सचिन व शिक्षक कर्मचारी यांनी प्रतिमेस पूजन केले २९९ व्या जयंतीनिमित्त मुख्याध्यापक यांनी आपले विचार मंडताना घाट मंदिरे आणि विहिरी बांधल्या समान होते तिच्यासाठी रंक नी राव प्रजेसाठी सदैव देह आपणास जिजवला राणी अहिल्याबाई होळकर होते नाव पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाईहोळकर अखंड हिंदुस्तानावर सलग २८ वर्ष राज्य कारभार करत उत्कृष्ट प्रशासकीय कुशल संघटक दानशूर महाराणी रणरागिणी कर्मयोगी दीनदुबळ्यांची माता कल्याणकारी राज्य निर्माण करणारी कर्म योगिनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त हार्दिक शुभेच्छा व त्रिवार मानाचा मुजरा याबरोबरच शालांत प्रमाणपत्र परीक्षेमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री दुनगे एस एम तर आभार श्री हेळगिरे एच डब्ल्यू यांनी मानले यावेळी पालक वर्ग उपस्थित होता.

## सहायक निबंधक, सहकारी संस्था, उदगीर यांचे कार्यालय

पत्ता : जुने शासकीय विश्रामगृहासमोर, भुविकास बँकेचे इमारत, उदगीर

जाब देणार

**अर्जदार :- श्री. गणेश महिला नागरी सह. पतसंस्था मर्या. उदगीर**

| अ.क्र. | कर्जदाराचे नांव व पत्ता | जामीनदाराचे नांव व पत्ता | दावा रक्कम |
| --- | --- | --- | --- |
| १ | हामीने लिंगेश्वर गोपीनाथ<br>मु.पो. शंभु उमरगा ता.उदगीर | १) शिवाजी शेषेराव बिरादार<br>माउली ऑटोमोबाईल, उमा चौक, उदगीर<br>२) लांडगे ओमकार भिवाजी<br>मु.कानेगाव पो. शंभु उमरगा<br>ता.उदगीर | ६८,२३५/- |

सदर दाव्याच्या कामी अर्जदारानी दाखल केलेल्या अर्जातील प्रतिवादी यांना पोस्टाने समन्स पाठविलेले आहे. तथापी काही प्रतिवादी यांना त्यांच्या पत्त्यातील अपुर्णतेमुळे पत्ता बदलल्यामुळे पोस्टोन समन्स पोहोच झालेली नसल्यामुळे सदरचे समन्स देण्यात येत आहे. उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने दि. ०८/०६/२०२४ रोजी दुपारी १२.३० वा दाव्या संबंधी कागदपत्रासह आपण या न्यायालयात हजर रहावे.

या नोटीसद्वारे प्रतिवादी यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहील्यास आपल्या गैरहजरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल याची कृप्या नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर आपण आपला पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल

(सदर जाहीर समन्स आज दि.०१/०६/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिला आहे.)

दिनांक :०१/०६/२०२४
ठिकाण :

शिक्का

(बी.एस. नंदापूरकर)
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था, उदगीर

कार्यालय : सहाय्यक निबंधक कार्यालय, उदगीर
पत्ता : जुने शासकीय विश्रामगृह, उदगीर जि.लातूर

CBSE Affiliation No. 1131357
ADMISSIONS OPEN
CBSE Class : NUR to X
FOUNDATION CLASSES FROM 6 TO 10
BUMPER DISCOUNT ON TRANSPORTATION





| Distance | Regular Charges | Discount before 20 June 2024 | Discount before 31 June 2024 |
| --- | --- | --- | --- |
| Up to 2 Km | 13,000 | 7,000 | 4,000 |
| Above 2 Km | 15,000 | 7,000 | 4,000 |


Computer Lab


Language Lab (Phonetics)


Science Lab


Maths Lab


Robotics Lab


Music Room

G. K. International School
Shellhal Road, Udgir 9503750007 / 9168050007